सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. ०९ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३२९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## भारतातील पहिल्या खासगी व्यावसायिक रॉकेट विक्रम १ चे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन

**हैदराबाद/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हैदराबाद येथील स्पेसटेक स्टार्टअप स्कायरूट एरोस्पेसच्या इन्फिनिटी कॅम्पसचे व्हर्च्युअल उद्घाटन केले. तसेच पंतप्रधान मोदींनी भारताच्या पहिल्या व्यावसायिक ऑर्बिटल रॉकेट, विक्रम-१ चे उद्घाटन केले. हे रॉकेट उपग्रहांना पृथ्वीजवळच्या लो अर्थ ऑर्बिट (ङएज) अर्थात लिओमध्ये घेऊन जाईल.

हैदराबादमधील २ लाख चौरस फूट जागेवर पसरलेल्या इन्फिनिटी सुविधेत दरमहा एक ऑर्बिटल रॉकेट तयार करण्याची क्षमता आहे. तसेच स्पेसटेक ही कंपनी प्रक्षेपण वाहनांच्या डिझाइन पासून निर्मिती आणि चाचणी पर्यंतची सर्व कामं करण्यास तत्पर



आहे. स्कायरूटचे इन्फिनिटी कॅम्पस हे भारताच्या नवीन विचारसरणीचे, नवोपक्रमाचे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे युवाशक्तीचे प्रतिबिंब आहे. आपल्या युवाशक्तीची नवोपक्रम, जोखीम घेण्याची क्षमता आणि उद्योजकता नवीन उंची गाठत आहे; असे पंतप्रधान मोदी उद्घाटनपर कार्यक्रमात म्हणाले.

येणारा काळ भारताचा, त्याच्या तरुणांचा आणि नवोन्मेषाचा आहे आणि येत्या पाच वर्षांत देश आपली प्रक्षेपण क्षमता नवीन उंचीवर नेईल. भारत जागतिक उपग्रह प्रक्षेपण परिसंस्थेत एक नेता म्हणून उदयास येईल, असा विश्र्वास पंतप्रधान मोदींनी व्यक्त केला. भारतातील अभियंते, उच्च दर्जाचे उत्पादन परिसंस्था, जागतिक दर्जाचे प्रक्षेपण स्थळे आणि नाविन्यपूर्ण मानसिकता यामुळे आपली अंतराळ क्षमता किफायतशीर आणि विश्र्वासार्ह आहे, म्हणूनच जगाला भारताकडून खूप अपेक्षा आहेत; असे पंतप्रधान मोदींनी भाषणातून ठामपणे सांगितले.

जागतिक कंपन्या भारतात उपग्रह बांधू इच्छितात, भारताकडून प्रक्षेपण सेवा घेऊ इच्छितात आणि भारतासोबत तंत्रज्ञान भागीदारी करू इच्छितात. भारताचे अंतराळ क्षेत्र जागतिक गुंतवणूकदारांसाठी एक आकर्षक ठिकाण बनत आहे; असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सांगितले.

भारताच्या अंतराळ प्रवासाला नवीन पंख देण्यात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या (इस्रो) भूमिकेचे त्यांनी कौतुक केले आणि सांगितले की या क्षेत्राने राष्ट्रीय सुरक्षेसह सर्व क्षेत्रांमध्ये पायाभूत भूमिका बजावली, ज्यामुळे सरकारने ऐतिहासिक अवकाश सुधारणा हाती घेतल्या आणि अवघ्या सहा ते सात वर्षांत त्यात परिवर्तन घडवून आणले, असे सांगत मोदींनी इस्रोचे जाहीर कौतुक केले. जगात लहान उपग्रहांची मागणी सतत वाढत आहे, प्रक्षेपण वारंवारता देखील वाढत आहे, नवीन कंपन्यांनी उपग्रह सेवा देण्यास सुरुवात केली आहे. येत्या काळात जागतिक अंतराळ अर्थव्यवस्था वाढणार आहे आणि भारतातील तरुणांसाठी ही एक मोठी संधी आहे; असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

## थोडक्यात...

### रुग्णालय उडवण्याची धमकी

**मुंबई :** मुंबईच्या नायर रुग्णालयाला ईमेलद्वारे धमकी मिळाली आहे. संध्याकाळी चार वाजता बॉम्बस्फोट करून रुग्णालय उडवून देऊ अशी धमकी देण्यात आली आहे. धमकी मिळताच रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना माहिती दिली आहे. माहिती मिळताच मुंबई पोलिसांचे पथक तसेच बॉम्ब स्काड आणि डॉग स्काड घटनास्थळी पोहोचले. संपूर्ण रुग्णालयात तपासणी करण्यात आली. या तपासणीत बॉम्ब सापडला नाही. अखेर ई मेलद्वारे फक्त त्रास देण्याच्या हेतूने धमकी देण्यात आल्याचे लक्षात आले. पोलिसांनी सायबर तज्ज्ञांच्या मदतीने ई मेल पाठवणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू केला. धमकीचा मेल पाठवणाऱ्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

### चार्टर विमानाने जाणार खेळाडू

**नवी दिल्ली :** अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील सुरू असलेल्या युद्धामुळे, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज आणि इंग्लंड सारखे संघ विश्र्वचषकातून बाहेर पडल्यानंतर अद्याप मायदेशी परतू शकलेले नाहीत. पण आता हे सर्व संघ चार्टर फ्लाइटने रवाना होणार आहेत. ज्यामध्ये दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिजचे क्रिकेटपटू एकत्र रवाना होणार आहेत. वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू रविवारी (८ मार्च) एकत्र रवाना होतील. दक्षिण आफ्रिकेचे आणि वेस्ट इंडिजचे क्रिकेटपटू प्रथम जोहान्सबर्गला जातील आणि तेथून वेस्ट इंडिजचे क्रिकेटपटू अँटिग्वाला जाण्यासाठी विमानाने जातील. इंग्लंडचे क्रिकेटपटू थेट चार्टर फ्लाइटने लंडनला रवाना होतील. या सर्व संघांच्या परतीसाठी आयसीसीने सर्व व्यवस्था केली आहे.

### आशुतोष ब्रम्हचारींवर हल्ला

**मुंबई:** शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्र्वरानंद यांच्यावर लैंगिक छळाचा गंभीर गुन्हा दाखल करणारे आशुतोष ब्रह्मचारी यांच्यावर 'रीवा एक्सप्रेस'मध्ये प्राणघातक हल्ला करण्यात आला आहे. रविवारी पहाटेच्या सुमारास एका अज्ञात हल्लेखोराने धारदार शस्त्राने त्यांचे नाक कापण्याचा आणि त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात आशुतोष ब्रह्मचारी गंभीर जखमी झाले असून, त्यांनी या कटामागे थेट शंकराचार्यांचा हात असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे.

### आरबीआय देणार नुकसान भरपाई

### रुग्णालय उडवण्याची धमकी

मुंबई : मुंबईच्या नायर रुग्णालयाला ईमेलद्वारे धमकी मिळाली आहे. संध्याकाळी चार वाजता बॉम्बस्फोट करून रुग्णालय उडवून देऊ अशी धमकी देण्यात आली आहे. धमकी मिळताच रुग्णालय प्रशासनाने पोलिसांना माहिती दिली आहे. माहिती मिळताच मुंबई पोलिसांचे पथक तसेच बॉम्ब स्काड आणि डॉग स्काड घटनास्थळी पोहोचले. संपूर्ण रुग्णालयात तपासणी करण्यात आली. या तपासणीत बॉम्ब सापडला नाही. अखेर ई मेलद्वारे फक्त त्रास देण्याच्या हेतूने धमकी देण्यात आल्याचे लक्षात आले. पोलिसांनी सायबर तज्ज्ञांच्या मदतीने ई मेल पाठवणाऱ्या व्यक्तीचा शोध सुरू केला. धमकीचा मेल पाठवणाऱ्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले.

### राज्यात तापमान वाढणार

मुंबई : राज्यात उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून अनेक भागांत तापमान झपाट्याने वाढताना दिसत आहे. राज्यातील कमाल तापमानाचा पारा ३६ अंश सेल्सिअस पार करून काही ठिकाणी चाळीशीकडे झुकताना दिसत आहे. हवामान खात्याने पुढील दोन दिवस राज्यातील तापमानात आणखी वाढ होण्याचा इशारा दिला असून काही जिल्ह्यांसाठी उष्णतेचा यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे.

## अजून सहा महिने युद्ध करण्याची आमची तयारी- क्षमता देखील; इराणनचा दावा

**तेहरान/वृत्तसंस्था :** मध्यपूर्वेत अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव दिवसेंदिवस वाढत असून परिस्थिती अधिक गंभीर होत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या हल्ल्यांमुळे संपूर्ण प्रदेशात अस्थिरता निर्माण झाली आहे. सध्या तरी हा संघर्ष कमी होण्याची शक्यता दिसत नाही.



इराणने दावा केला आहे की तो अमेरिका आणि इस्रायलविरुद्ध किमान पुढचे सहा महिने तीव्र संघर्ष सुरू ठेवू शकतो. इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स (खठऋ) ने रविवारी एका न्यूज एजन्सीला दिलेल्या निवेदनात हा दावा केला.गार्ड्सचे प्रवक्ते अली मोहम्मद नैनी यांनी सांगितले की, इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणच्या सशस्त्र दलांकडे सध्याच्या मोहिमेच्या गतीने किमान सहा महिने संघर्ष सुरू ठेवण्याची पूर्ण क्षमता आहे.

आयआरजीसीच्या दाव्यानुसार, त्यांनी संपूर्ण मध्यपूर्वेत अमेरिकन आणि इस्रायली तळ तसेच त्यांच्याशी संबंधित २०० पेक्षा अधिक ठिकाणांना लक्ष्य केले आहे.

दरम्यान, इस्रायलनेही इराणच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर हल्ले केले आहेत. शनिवारी तेहरान आणि शेजारील करज शहरात जोरदार स्फोट झाले. इस्रायली सैन्याने अनेक इंधन साठवण संकुलांवर हल्ले केल्याने आकाशात आग आणि धुराचे मोठे ढग दिसून आले. सोशल मीडियावर समोर आलेल्या व्हिडिओंमध्ये हल्लाग्रस्त भागांमध्ये मोठ्या आगीच्या ज्वाळा उसळताना दिसत आहेत.

अमेरिका आणि इस्रायलने तेहरान आणि अल्बोर्ज प्रांतांतील अनेक तेल साठवण डेपोना लक्ष्य केल्याचेही वृत्त आहे. दरम्यान, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी इराणविरुद्ध पुढे आणखी अनेक सरप्राइज कारवाया होण्याचा इशारा दिला आहे. या घडामोडींमुळे मध्यपूर्वेत तणाव अधिक वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## नितीश कुमारांचा मुलगा निशांत कुमारांचा ऐन पन्नाशीत जेडीयूमध्ये प्रवेश

**पाटणा/वृत्तसंस्था :** बिहारमध्ये एक मोठी राजकीय घटना घडली आहे. बिहारचे मुख्यमंत्री आणि जनता दल संयुक्त अर्थात जेडीयूचे अध्यक्ष नितीश कुमार यांचा मुलगा निशांत कुमार याने पक्षप्रवेश करत राजकीय कारकिर्दीचा शुभारंभ केला. आता नितीश कुमार ७५ वर्षांचे झाले आहेत तर त्यांचा मुलगा निशांत कुमार ५० वर्षांचा आहे. पन्नाशीत जेडीयूमध्ये प्रवेश करणारा निशांत लवकरच महत्त्वाची राजकीय जबाबदारी हाताळणार असल्याची चर्चा आहे.

नितीश कुमार यांनी बिहारमधून जेडीयूच्या तिकिटावर राज्यसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरला आहे. राज्यसभेवर खासदार झाल्यानंतर नितीश कुमार बिहारच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार आहेत. यानंतर निशांत कुमार बिहारमध्ये महत्त्वाची राजकीय जबाबदारी हाताळणार असल्याचे वृत्त आहे.

नितीश कुमारांनी राजीनामा दिल्यानंतर तांत्रिकदृष्ट्या बिहारचे सरकार विसर्जित होईल. यानंतर जेडीयू आणि भाजपच्या आमदारांच्या बैठका होतील. बिहारसाठी नवा मुख्यमंत्री निवडला जाईल. नव्या मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात स्थापन होणाऱ्या सरकारमध्ये निशांत कुमार उपमुख्यमंत्री हे पद स्वीकारणार असल्याची चर्चा आहे.

सक्रीय सदस्य म्हणून वडिलांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून काम करणार असल्याचे निशांत कुमार म्हणाले. नितीश कुमारांचा राज्यसभेवर जाण्याचा निर्णय हा त्यांचा वैयक्तिक निर्णय आहे, असेही निशांत कुमार यांनी सांगितले.



### कोण आहेत निशांत कुमार ?

निशांत यांचा जन्म २० जुलै १९७५ रोजी झाला. ते नितीश कुमार आणि दिवंगत मंजू सिन्हा यांचे एकुलते एक पुत्र आहेत. सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या निशांत यांनी रांची येथील बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इखढ), मेसरा येथून शिक्षण पूर्ण केले. ते पन्नाशीत पोहोचल्यावर राजकारणात पदार्पण करत आहेत.

### नितीश कुमार काय म्हणाले ?

संसदेच्या दोन्ही सभागृहांचे (लोकसभा व राज्यसभा) आणि राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे (विधानसभा व विधानपरिषद) सदस्य होण्याची इच्छा होती. आतापर्यंत लोकसभा खासदार, विधानसभा आमदार, विधानपरिषद सदस्य ही सर्व पदं हाताळून झाली आहे. फक्त राज्यसभेत सदस्य म्हणून कधी गेलो नव्हतो. ही इच्छा आता पूर्ण करून घेत असल्याचे नितीश कुमार यांनी सांगितले. लोकसभा, राज्यसभा, विधानसभा आणि विधानपरिषद या चार सभागृहांचे सदस्य राहिलेल्या बिहारच्या नेत्यांमध्ये लालूप्रसाद यादव आणि सुशीलकुमार मोदी आहेत. या यादीत आता नितीश कुमार यांचाही लवकरच समावेश होणार आहे.

## इस्रायलच्या लेबनॉनवरील हल्ल्यात ४१ जणांचा मृत्यू

**तेल अवीव/वृत्तसंस्था :** इस्रायलने लेबनॉनवर मोठा हल्ला केला असून या हल्ल्यात ४१ जणांचा मृत्यू झाला आहे. नबी शीट येथे झालेल्या हल्ल्यानंतर मोठ्या खड्ड्याभोवती जळालेल्या इमारती, तुटलेली छते आणि जमिनीवर विखुरलेली शस्त्रे दिसून आली.

इस्रायली लष्कराने लेबनॉनमधील नबी शीट परिसर रिकामा करण्याचा इशारा दिला होता. नबी शीटचे महापौर हानी मौसावी यांनी सांगितले, या इशाऱ्यानंतर आम्ही मुलांना वाचवण्यासाठी त्यांना शहराबाहेर काढण्याची तयारी सुरू केली. लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की नबी शीट आणि आसपासच्या भागात झालेल्या हल्ल्यांमध्ये ४१ जणांचा मृत्यू झाला असून ४० जण जखमी झाले आहेत. स्फोट इतके भीषण होते की एका कारने इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर जाऊन धडक दिली. या हल्ल्यात अनेक इमारती कोसळल्या आणि घरे उद्ध्वस्त झाली. एका उद्ध्वस्त घरात हिजबुल्लाहच्या नेत्यांचे फाटलेले पोस्टरही आढळले.

दरम्यान, इस्रायलने शनिवारी (७ मार्च) लष्करी कारवाईची माहिती देताना सांगितले की १९८६ पासून बेपत्ता असलेल्या नेव्हिगेटर रोन अराद यांच्या मृतदेहाचा शोध घेण्यासाठी लेबनॉनमध्ये रात्रभर विशेष मोहीम राबवण्यात आली होती. मात्र, त्याबाबत कोणताही ठोस पुरावा किंवा माहिती मिळाली नाही.

## पुण्यात पुन्हा टोळी युद्धाचा भडका, वर्चस्वाच्या वादातून गंगाधाम रोडवर मध्यरात्री गोळीबार, तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा**

**पुणे, दि. ०८ मार्च :** पुण्यात पुन्हा एकदा टोळी युद्धाचा भडका उडालेला बघायला मिळत आहे. या टोळीयुद्धात शुक्रवारी रात्री गोळीबाराची घटना घडली. या गोळीबारात एका तरुणाच्या पाठीत गोळी लागली. या घटनेमुळे तरुण गंभीर जखमी जाला आहे.

पुण्याच्या गंगाधाम रोडवर शुक्रवारी उशिरा रात्री गोळीबाराची थरारक घटना घडली. दोन गटांतील जुन्या वैमनस्यातून हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. हल्लेखोरांनी एका तरुणाला लक्ष्य करून पिस्तुलातून गोळी झाडली. मात्र नेम चुकल्याने गोळी दुसऱ्याच तरुणाच्या पाठीत लागली. मार्केटयार्ड परिसरातील वखार महामंडळाकडून गंगाधामकडे जाणाऱ्या रस्त्यावर रात्री साडेअकराच्या सुमारास हा प्रकार घडला. या गोळीबारात मोझेस शेकापूरे उर्फ मोज्या (वय २२, रा. मिनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) हा जखमी झाला. गोळी त्याच्या पाठीत घुसली असून त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

## देवगिरी बँकेच्या वतीने 'देवगिरी-वैजापूर तालुका भूषण' पुरस्कार वितरण



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ मार्च :** भारतीय संस्कृती ही जगातील महान संस्कृती असून आपल्या रुढी-परंपरा या विज्ञानाशी जोडलेल्या आहेत. भारतातील कुटुंबसंस्था जगासाठी आदर्श असून तिचे पुनरुज्जीवन करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या देवगिरी प्रांताचे प्रांत कार्यवाह धनंजय धामणे यांनी केले. ते देवगिरी नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने वैजापूर शहरातील पंचायत समितीच्या विनायकराव पाटील सभागृहात आयोजित देवगिरी-वैजापूर तालुका भूषण पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

वैजापूर तालुक्यातील झुंबरलालजी शर्मा, गोकुळ सुरासे, शिवनाथ राहने आणि डॉ. बबनराव साळे यांचा समाजातील उल्लेखनीय कार्याबद्दल बँकेच्या वतीने देवगिरी-वैजापूर तालुका भूषण पुरस्काराने शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी वैजापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष डॉ. दिनेशसिंह परदेशी यांनी मनोगत व्यक्त करताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यप्रणालीवर चालणाऱ्या देवगिरी बँकेच्या वतीने वैजापूर तालुक्यातील नागरिकांचा होत असलेला सन्मान ही अभिमानास्पद बाब असल्याचे नमूद केले.

देवगिरी बँकेचे अध्यक्ष व जलदूत किशोर शितोळे यांनी बँकेच्या सामाजिक, वैचारिक आणि समाजाभिमुख उपक्रमांची माहिती देत संस्थेच्या वाटचालीवर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ. अमिता लेकुरवाळे यांनी केले. सूत्रसंचालन देवगिरी बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी केले, तर मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर यांनी आभार मानले.

या प्रसंगी रा.स्व.संघाचे तालुका संघचालक अरुण जगताप वैजापूरचे प्रतिष्ठित व्यापारी काशिनाथ शेठ गायकवाड, देवगिरी बँकेचे संचालक राजेश सावळकर, नागनाथ काजळे, प्रज्ञाताई तल्हार, मंगलताई वाहेगावकर, सुरेश जगाडे, सरदारसिंग बैनाडे यांच्यासह वैजापूर शहरातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# एमजीएममध्ये अप्लाइड एआय आंतरराष्ट्रीय समिटचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ मार्च :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि डिस्कव्हर लॅब्स एआय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सिलिकॉन प्लेन्स इंटरनॅशनल समिट ऑन अप्लाइड एआय २०२६' या आंतरराष्ट्रीय समिटचे उद्घाटन एमजीएमच्या रुक्मिणी सभागृहात उत्साहात झाले.

या समिटमध्ये पद्मश्री प्रा. दीपक बी. फाटक (आयआयटी बॉम्बे), मनपा आयुक्त जी. श्रीकांत, शास्त्रज्ञ डॉ. दिलीप कुशवाह, शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब राजळे, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, सीएमआयएचे अध्यक्ष उत्सव माच्छर, ॲडव्हेंट ऑपरेटिंग पार्टनर राज गोरे, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, डिस्कव्हर लॅब्स एआयचे संस्थापक मधुप मुदिराज आणि समिट संयोजक प्रा. डॉ. परमिंदर कौर यांची प्रमुख उपस्थिती होती. समिटचे आयोजन एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव आणि कुलपती अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

ही समिट भारतातील औद्योगिक दृष्टिकोनातून आयोजित अप्लाइड एआयवरील पहिली औद्योगिक-आधारित समिट मानली जात आहे. सकाळच्या सत्रात हेल्थकेअर एआय आणि गव्हर्नन्स एआय या विषयांवर 'रिव्हर्स पिच' संकल्पनेतून प्रॉब्लेम स्टेटमेंट देण्यात आले. विद्यार्थ्यांनी त्यावर उपाय सुचवले असून विजेत्यांना दीड लाख रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे.

सत्रात मनपा आयुक्त जी. श्रीकांत, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयाचे उपअधिष्ठाता डॉ. प्रविण सूर्यवंशी आणि राज गोरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते समिट पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

**मान्यवरांच्या थोडक्यात प्रतिक्रिया :**

**पद्मश्री प्रा. दीपक बी. फाटक :** एआय संधी मोठ्या; विद्यार्थ्यांनी आत्मविश्र्वासाने नवकल्पना स्वीकारून समाजासाठी काम करावे.

**जी. श्रीकांत :** स्थानिक समस्यांचे एआय उपाय संभाजीनगरातून निर्माण व्हावेत, ही अपेक्षा.

**प्रा. डॉ. विलास सपकाळ :** विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ देणारी ही समिट संशोधनाला चालना देईल.

**उत्सव माच्छर :** समिटमधील कल्पनांवर उद्योग क्षेत्र प्रत्यक्ष काम करण्यास तयार आहे.

**डॉ. आशिष गाडेकर :** एमजीएम शिक्षण, संशोधन आणि समाजाभिमुख कार्याची परंपरा पुढे नेत आहे.

**मधुप मुदिराज :** एआय नोकऱ्या हिरावणारा नाही; तो समाधान देणारा डिजिटल सहकारी.

**प्रा. डॉ. परमिंदर कौर :** सहा महिन्यांच्या नियोजनातून साकारलेली समिट विद्यार्थ्यांसाठी मोठी संधी.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हृषीकेश काकडे व प्रा. सिमरन कौर यांनी केले. आयोजनात प्रा. पियुष काळे, प्रा. जावेद सिद्दीकी, प्रा. अनुज डोमाळे, प्रा. काजल अगरवाल यांच्यासह अनेकांनी योगदान दिले.

# थोडक्यात...

## होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया कडून रस्ता सुरक्षा शिक्षण उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर:** सजग मोबिलिटीला प्रोत्साहन देण्याच्या आपल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून, होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडियाने महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे संरचित रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान आयोजित केले. या उपक्रमात रॉयल ओक्स वर्ल्ड स्कूल आणि बीएसजीएम स्कूलमधील २४०० हून अधिक सहभागी एकत्र आले आणि दैनंदिन वाहतूक सुरक्षेबाबतची माहिती एका आकर्षक आणि शिकण्यासारख्या अनुभवामध्ये रूपांतरित झाली. या मोहिमेत रस्ता सुरक्षा शिक्षणावर आधारित जनजागृती सत्रे, खेळ, क्विझ आणि परिस्थितीवर आधारित चर्चा आयोजित करण्यात आल्या. या उपक्रमांची रचना अशी करण्यात आली होती की सहभागी सुरक्षा नियमांना प्रत्यक्ष आयुष्यातील परिस्थितींशी जोडू शकतील. 'करून शिकणे' या पद्धतीवर विशेष भर देण्यात आला, ज्यामुळे सर्व युवा सहभागी सतर्कता, शिस्त आणि जबाबदार रस्ता वापरकर्ते म्हणून त्यांची भूमिका याबाबतचे महत्त्वाचे संदेश सहज समजू शकले.

## मेडिकोवर हॉस्पिटलमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन सत्र

जागतिक महिला दिनानिमित्त मेडिकोवर हॉस्पिटलमध्ये महिला कर्मचाऱ्यांसाठी सायबर सुरक्षेबाबत विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. डिजिटल युगात वाढत चाललेल्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.या कार्यक्रमात ग्रामीण विभागाचे डीवायएसपी श्री. गौतम पातारे यांनी सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले. आजच्या काळात मोबाईल, इंटरनेट आणि ऑनलाइन व्यवहारांचा वापर झपाट्याने वाढत आहे. बँकिंग, ऑनलाइन खरेदी, शासकीय सेवा तसेच वैयक्तिक संवादासाठी मोठ्या प्रमाणावर इंटरनेटचा वापर होत असला तरी याचबरोबर सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत असल्याचे त्यांनी सांगितले. फसवे फोन कॉल, बनावट वेबसाईट, फिशिंग ई-मेल, सोशल मीडियावरील बनावट लिंक तसेच ओटीपी किंवा बँक तपशील मागणारे संदेश यांच्या माध्यमातून अनेकांची आर्थिक फसवणूक केली जाते. अनेक वेळा नागरिक अज्ञानामुळे किंवा घाईगडबडीत अशा संदेशांना प्रतिसाद देतात आणि त्यामुळे आर्थिक नुकसान होते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## रियलमी कडून रियलमी सी ८३ ५ जी स्मार्टफोन लाँच

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय तरुणाईमध्ये अतिशय लोकप्रिय असलेल्या रियलमी या स्मार्टफोन ब्रँडने आज रियलमी सी८३ ५ जी लाँच करण्याची घोषणा केली. यामध्ये ७००० एमएएच ची सेगमेंटमधील सर्वात मोठी टायटन बॅटरी, १४४ एचझेड डिस्प्ले आणि ४-इयर स्मूथ परफॉर्मन्सचे एकत्रीकरण पाहायला मिळते. रियलमी सी ८३ ५जी मध्ये १४४ एचझेड अडॅप्टिव्ह रिफ्रेश रेटला सपोर्ट करणारा ६.७ इंच लांबीचा एलसीडी डिस्प्ले आहे. यामुळे स्क्रोलिंग अधिक स्मूथ होते, ॲनिमेशन प्रवाही वाटतात आणि गेमिंगचा अत्यंत प्रतिसादात्मक अनुभव मिळतो.तसेच, मोठ्या प्रमाणावर वापर करताना फोनची कामगिरी स्थिर राहावी यासाठी यामध्ये ५३३४ एमएमऑ एअरफ्लो व्हीसी कूलिंग सिस्टिम देण्यात आली आहे. या सेगमेंटमधील ही सर्वात मोठी व्हेपर चेंबर प्रणाली असून, ती फोनची उष्णता प्रभावीपणे बाहेर काढून फोनला थंड ठेवण्यास मदत करते.

# बिडकीन पोलिसांनी १९ गोवंश जनावरांना कत्तलीपासून दिले जीवदान



**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०८ मार्च :** त्रपती संभाजीनगर ते बिडकीन चितेगाव रोडवरील टोलनाका परिसरातून कत्तलीसाठी नेण्यात येत असलेल्या १९ गोवंश जातीच्या जनावरांची बिडकीन पोलिसांनी सुटका करून त्यांना जीवदान दिले. दि. ७ मार्च रोजी रात्री सुमारे २३:५० वाजण्याच्या सुमारास आयशर वाहन क्र. चक २० ऋठ २०९२ मधून गोवंश जनावरे कत्तलीच्या उद्देशाने नेण्यात येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कारवाई करून वाहन चालक अजय अशोक गायकवाड (वय २३, रा. पाटोदा ता. चाळीसगाव, जि. जळगाव) याला ताब्यात घेतले. या वाहनामध्ये सुमारे ५ लाख ४० हजार रुपये किमतीची एकूण १९ गोवंश जनावरे अत्यंत निर्दयपणे कोंबून ठेवण्यात आली होती. तसेच जनावरांसाठी कोणतेही वैद्यकीय दाखले, परवानगी, चारा-पाणी किंवा प्रथमोपचाराची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. बिडकीन पोलिसांनी सर्व जनावरांची सुटका करून ती पारुंडी (ता. पैठण) येथील पारसनाथ गोशाळेत सुरक्षित ठेवली आहेत. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक मनोज एकनाथ पाटील यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार अशोक सोकटकर व जमादार आप्पासाहेब माळी करत आहेत.

# बजाज हॉस्पिटलतर्फे आयोजित वॉकेथॉन २०२६ संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ मार्च :** एमएमआरआय ट्रस्ट संचलित कमलनयन बजाज हॉस्पिटलतर्फे स्टेप इन टू न्यू लाईफ या संकल्पनेवर आधारित 'वॉकेथॉन २०२६ -' सेलिब्रेटिंग द जॉय ऑफ मुव्हमेंट या सार्वजनिक जनजागृती उपक्रमाचे आयोजन शनिवार, ७ मार्च रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत विभागीय क्रीडा संकुल येथे करण्यात आले. चालण्याच्या सवयीला प्रोत्साहन देत निरोगी जीवनशैलीचा संदेश देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

या वॉकेथॉनमध्ये टोटल नी रिप्लेसमेंट शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या ४२ रुग्णांचा विशेष सन्मान करण्यात आला. शस्त्रक्रियेनंतर पुन्हा आत्मविश्वासाने सक्रिय जीवनाकडे वाटचाल करणाऱ्या या रुग्णांच्या जिद्दीचा गौरव या कार्यक्रमातून करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रातील या उल्लेखनीय टप्प्याची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद करण्यात आली असून हा आरोग्यसेवेतील महत्त्वाचा मैलाचा दगड मानला जात आहे.

सांध्यांचे आरोग्य, गुडघेदुखीचे व्यवस्थापन, लवकर निदान, आधुनिक गुडघा प्रत्यारोपण उपचार आणि पुनर्वसन याबाबत जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि दीर्घकालीन गुडघ्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींना नियमित हालचालीचे महत्त्व पटवून देण्यावर भर देण्यात आला.

या वॉकेथॉनचे मार्गदर्शन डॉ. शिवकुमार संतपुरे, डॉ. धैर्यशील गायकवाड आणि डॉ. मंगला बोरकर हे असून कार्यक्रमाला खासदार संदीपानराव भुमरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## आज झी कुटुंब नॉमिनेशन पार्टी विशेष कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर:** झी टीव्हीवरील झी कुटुंब नॉमिनेशन पार्टी हा विशेष कार्यक्रम रविवारी ८ मार्च रोजी प्रसारित होणार असून या सोहळ्यात झी परिवारातील लोकप्रिय मालिकांचे कलाकार एकत्र झळकणार आहेत. वसुधा, सरू, गंगा माई की बेटियां, जगद्धात्री, लक्ष्मी निवास, जाने अनजाने हम मिले, तुम से तुम तक आणि जागृति या मालिकांतील कलाकारांनी नृत्य, खेळ आणि मनोरंजक सादरीकरणांमधून कार्यक्रमाची रंगत वाढवली. यावेळी तुम से तुम तक मालिकेतील अभिनेता शरद केळकर याला सूत्रसंचालक जय सोनीने टीआरपी किंग म्हणून गौरविले. गेली दोन दशके प्रेक्षकांचे प्रेम मिळवत असलेल्या शरदच्या यशस्वी प्रवासाचेही या कार्यक्रमात कौतुक करण्यात आले.

# टोयोटा किर्लोस्कर मोटरची शासकीय आयटीआय सोबत भागीदारी; अद्ययावत प्रयोगशाळेचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ मार्च ::** टोयोटा किर्लोस्कर मोटरने छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (देवगिरी) येथे अद्ययावत प्रयोगशाळेचे उद्घाटन केले. महाराष्ट्र शासनासोबत झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना सक्षम करण्याच्या उपक्रमातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या उपक्रमांतर्गत कंपनीने मराठवाडा आणि नागपूर विभागातील १६ शासकीय आयटीआय संस्थांचे आधुनिकीकरण केले आहे.

या प्रसंगी महाराष्ट्राचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नवोन्मेष मंत्री मंगल प्रभात लोढा, टोयोटा किर्लोस्कर मोटरचे विक्रम गुलाटी (कार्यकारी उपाध्यक्ष - कॉर्पोरेट व्यवहार व प्रशासन) तसेच शासकीय आयटीआयचे अधिकारी, प्रशिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या भागीदारीमुळे ग्रामीण भागातील युवकांना जागतिक दर्जाचे तांत्रिक कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध होणार असून त्यांना कुशल तंत्रज्ञ म्हणून घडवण्याचा उद्देश आहे. छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी आयटीआयला राज्यातील कौशल्य विकासासाठी आदर्श नमुना म्हणून विकसित करण्यात आले आहे. टोयोटा किर्लोस्कर मोटरने २०३० पर्यंत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांतील ४५ आयटीआय संस्थांच्या विकासाला सहकार्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

या शैक्षणिक वर्षापासून संस्थेत उत्पादन आणि सेवा क्षेत्राशी संबंधित कौशल्य प्रशिक्षणाचा समावेश करण्यात येणार असून त्यामुळे विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे.

# इतिहास घडला; छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पहिल्यांदाच गडावर पार पडला शिवरायांचा अभिषेक

## सोयगावकरांचा 'स्वाभिमानी' पायी सोहळा



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. ०८ मार्च :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या इतिहासात आज एक सुवर्णपान जोडले गेले.निमित्त होते 'तिथीप्रमाणे' साजरा होणाऱ्या शिवजन्मोत्सवाचे. जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एका किल्ल्यावर शिवरायांचा राजेशाही अभिषेक सोहळा संपन्न झाला आहे.सोयगाव येथील शिवभक्तांनी केवळ पारंपरिक मिरवणूक न काढता, ऐतिहासिक वेताळवाडी किल्ल्यावर भव्य पायी पालखी सोहळा नेऊन महाराजांना वैदिक मंत्रोच्चारात दुग्धाभिषेक घातला.या अनोख्या आणि संस्कारक्षम उपक्रमाची चर्चा आज संपूर्ण जिल्ह्यात होत आहे.

छत्रपती शिवरायांनी सकल हिंदू समाज,बारा बलुतेदार, अठरापगड जाती यांना संघटित करून हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली.परंतु आज अनेकजण स्वार्थापोटी समाजात फूट पाडण्याचे काम करत आहे.आपण असेच जातीपातीत भांडत राहिलो तर पंचवीस वर्षानंतर काळ मोठा वाईट असेल.त्यामुळे आपसी मतभेद विसरून हिंदुत्वासाठी सदैव एकजूट रहा असे प्रतिपादन शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे धारकरी व प्रकुख वक्ते जसवंत सिंह यांनी केले.ते सोयगाव येथील शिव जन्मोत्सव कार्यक्रमात बोलत होते.यावेळी मान्यवर म्हणून रा.स्व.संघाचे स्वंयसेवक कल्पेश जोशी, राजेशिवबा प्रतिष्ठानचे भागीनाथजी,राजा शिवछत्रपती परिवाराचे भरतजी बोचरे आणि सह्याद्री प्रतिष्ठानचे डॉ. पवनगिरेजी उपस्थित होते.छत्रपती शिवरायांनी पूर्ण आयुष्यभर हिंदू धर्म रक्षण व धर्मस्थापना करण्यासाठी कार्य केले.महाराजांचे विचार जाणून घेण्यासाठी खरा इतिहास माहित करून घेतला पाहिजे आणि इतिहासाचे विकृतीकरण रोखले पाहिजे असे प्रतिपादन कल्पेश जोशी यांनी केले.तर महाराष्ट्रातील गडकोट हेच आपले खरे वैभव आहे.त्यांना संरक्षण आणि संवर्धनासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजे.छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात दहा महत्त्वपूर्ण किल्ले असून त्यांची देखरेख नीट झाली पाहिजे.तसेच गडकोटावर होणारे अतिक्रमण कायदेशीर पद्धतीने काढून टाकण्यासाठी पुढे आले पाहिजे असे प्रतिपादन भागीनाथ शिरके यांनी केले.

गडकोटांचे जतन व्हावे आणि तरुण पिढीला इतिहासाची खरी ओळख व्हावी,या उदात्त उद्देशाने सोयगाव तालुक्यातील समर्पण फाउंडेशनने या 'पायी पालखी सोहळा' आणि 'गडकोट मोहिमेचे' आयोजन केले होते. सोयगावच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सकाळी ठिक ८ वाजता या शोभायात्रेला भगव्या वातावरणात प्रारंभ झाला.या मोहिमेचे मुख्य आकर्षण म्हणजे किल्ल्यावर झालेला छत्रपती शिवाजी महाराजांचा 'वैदिक मंत्रोच्चारातील दुग्ध अभिषेक'. अत्यंत भक्तीमय वातावरणात हा सोहळा पार पडला,त्यानंतर गडावर विधीवत 'शस्त्र पूजन' देखील करण्यात आले.

या ऐतिहासिक सोहळ्यासाठी सोयगाव तालुक्यातील २० गावांतील शेकडो शिवभक्त एकत्र आले होते.भालदार-चोपदार,शिस्तबद्ध ध्वजधारी आणि पारंपरिक ढोल-ताशांच्या गजराने वेताळवाडी किल्ल्याचा परिसर दुमदुमून गेला होता.आधुनिकतेच्या नावाखाली होणाऱ्या गोंगाटापेक्षा परंपरेचा हा गजर अधिक प्रभावी ठरला.

आजकाल शिवजयंतीच्या नावाखाली डीजे आणि कर्णकर्कश आवाजाचा भरणा वाढत असताना, सोयगावच्या समर्पण फाउंडेशन संचलित शिवजन्मोत्सव सोहळा समितीने संपूर्ण राज्याला एक नवा पायंडा घालून दिला आहे.समर्पण फाउंडेशनच्या या 'संस्कारक्षम आदर्श शिवजयंती चे संपूर्ण सोयगाव तालुक्यात कौतुक होत आहे.

# ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्लु माऊंटेन प्री स्कूलमध्ये जागतिक महिला दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. ०८ मार्च :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कूल व ब्लु माऊंटेन प्री स्कूल येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महिला पालकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शकुंतला तोतला व मीना तिवारी उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या पूजनाने कार्यक्रमाची शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका सविता सतीश तोतला यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

महिला दिनानिमित्त विविध मनोरंजक व स्पर्धात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अंताक्षरी स्पर्धा, रेट्रो टू मेट्रो थीमवरील रॅम्प वॉक, मजेदार गेम्स अशा अनेक उपक्रमांचा समावेश होता. उपस्थित महिलांनी या सर्व कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला व वातावरण आनंदमय झाले. याशिवाय शाळेत मागील १२ दिवसांपासून मी आणि आई हा विशेष उपक्रम राबविण्यात आला होता. या उपक्रमांतर्गत आई व मुलांना दररोज एक वेगळा टास्क देण्यात येत होता. तो टास्क पूर्ण करून त्याचा व्हिडिओ आपल्या वर्गशिक्षकांकडे पाठविण्याचे सांगण्यात आले होते. या उपक्रमाला पालक व विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमातील विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व महिला शिक्षकांनी परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या सन्मानाचा व त्यांच्या कार्याचा गौरव करणारा हा उपक्रम सर्व उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.

# राज्याच्या अर्थसंकल्पातील आरोग्यविषयक निर्णय स्वागतार्ह

## योजनांची प्रभावी अंमलबजावणीही गरजेची - डॉ. अनुपम टाकळकर



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. ०८ मार्च :** महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्रासाठी काही सकारात्मक निर्णय घेण्यात आल्याचे मत इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर यांनी व्यक्त केले. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आजारांचे कव्हरेज १७९२ वरून ४५३७ पर्यंत वाढविण्याचा निर्णय स्वागतार्ह असल्याचे त्यांनी म्हटले. यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय रुग्णांना अधिक आजारांवर उपचार मिळण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

कॅन्सर, मधुमेह आणि हृदयविकार यांसारख्या जीवनशैलीजन्य आजारांचे लवकर निदान करण्यासाठी राज्यभर आरोग्य तपासणी मोहिमेसाठी सुमारे ४५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांवर दिलेला भर महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी नमूद केले. शहरी भागातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्र्वभूमीवर स्वतंत्र शहरी आरोग्य विभाग उभारण्याची घोषणा तसेच डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान ही संकल्पनाही सकारात्मक असल्याचे त्यांनी सांगितले.

तथापि, महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेअंतर्गत अनेक रुग्णालयांना उपचारांचे पैसे वेळेवर मिळत नसल्याची समस्या असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. काही ठिकाणी देयके महिनोनमहिने प्रलंबित राहतात. त्यामुळे योजनांचे कव्हरेज वाढवण्याबरोबरच रुग्णालयांना वेळेवर आणि नियमित देयके मिळतील याकडे सरकारने लक्ष देणे आवश्यक आहे. राज्यातील जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर, नर्सेस आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता अजूनही जाणवते. पायाभूत सुविधा आणि आधुनिक उपकरणांसाठी अधिक गुंतवणुकीची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर येथे स्थापन करण्याचा निर्णय महत्त्वाचा असला तरी राज्याच्या मध्यवर्ती भागात असलेल्या छत्रपती संभाजीनगरलाही अशा मोठ्या आरोग्य संस्थांचा लाभ मिळणे गरजेचे आहे. मराठवाड्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे एम्ससारखी संस्था उभारण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.

तसेच नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्यापेक्षा सध्या अस्तित्वात असलेल्या सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांना बळकटी देणे अधिक गरजेचे आहे. त्याठिकाणी आवश्यक प्राध्यापक आणि कर्मचारी भरती करणे, सुविधा वाढवणे आणि रुग्णालये अधिक आधुनिक करणे यावर सरकारने विशेष लक्ष द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

एकूणच आरोग्य योजनांचा विस्तार आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांवर दिलेला भर सकारात्मक असला तरी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, रुग्णालयांना वेळेवर देयके, डॉक्टरांची भरती, विद्यमान वैद्यकीय महाविद्यालयांचे सशक्तीकरण आणि प्रदेशनिहाय आरोग्य सुविधा यावर सरकारने अधिक लक्ष देणे आवश्यक असल्याचे डॉ. टाकळकर यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### आशा देशमुख यांच्या शैक्षणिक व्हिडिओची राज्यस्तरावर निवड

**परभणी,/प्रतिनिधी:-** डॉ. जयंत नारळीकर गणित व विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत सावित्रीबाई फुले मुलींचे हायस्कूल येथील जेष्ठ गणित सहशिक्षिका सौ. आशा बबनराव देशमुख यांनी तयार केलेल्या शैक्षणिक व्हिडिओची राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्याकडून निवड करण्यात आली आहे.

कल्पकतेतून व अध्यापनाच्या अनुभवातून तयार करण्यात आलेल्या या दृकश्राव्य शैक्षणिक साहित्याच्या निर्मितीबद्दल शनिवारी सावित्रीबाई फुले मुलींचे हायस्कूलच्या शिक्षक-शिक्षिका व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका सौ. जया जाधव, सौ. आशा देशमुख, सौ. अरुणा पाटील, यशवंत मकरंद, सिताराम ठाकरे, सौ. प्रणिता पांचाळ, रमेश मुळे तसेच विठ्ठल शिंदे उपस्थित होते.

### कालव्यात आढळला युवकाचा मृतदेह; पाण्यात बुडून मृत्यूचा संशय व्यक्त

**परभणी,/प्रतिनिधी :** कालव्यात आढळला युवकाचा मृतदेह; पाण्यात बुडून मृत्यूचा संशय व्यक्त करण्यात आला होता. परभणी शहरालगतच्या मातोश्री नगर परिसरातील कॅनॉलमध्ये शनिवारी (दि.०७) सकाळी एका युवकाचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक माहितीनुसार पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून या प्रकरणी नवा मोंढा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळच्या सुमारास काही नागरिकांना कॅनॉलच्या पाण्यात एक मृतदेह तरंगताना दिसला. याची माहिती तात्काळ पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच नवा मोंढा पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह पाण्याबाहेर काढला. मृत युवकाची ओळख ओंकार बंडू अवचार (वय ३५, रा. विश्वास नगर, परभणी) अशी पटली आहे. ओंकार अवचार यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच त्यांच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पुढील तपासणीसाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविला.

दरम्यान, या घटनेची नोंद नवा मोंढा पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून करण्यात आली असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक घोंडो यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ मोठी गर्दी जमली होती. घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास पोलिस करत आहेत.

### भूमीअभिलेख विभागातील संतप्त आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांचा शासनास निर्वाणीचा इशारा : कामबंद आंदोलन सुरुच

**परभणी,/प्रतिनिधी :** भूमीअभिलेख विभागातील तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात राज्य सरकारने सुरु केलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ संतप्त आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांनी जोपर्यंत मागण्या पूर्ण होणार नाहीत तोपर्यंत असहकार व कामबंद आंदोलन सुरुच ठेवावयाचा निर्णय घेतला आहे.

भूमि अभिलेख विभाग असो, अन्य विभागातील भूमापक किंवा सर्वेअर संवर्गातील तांत्रिक कर्मचाऱ्यांना तांत्रिक वेतन मिळावे यासह अन्य मागण्यांकरीता गेल्या काही वर्षांपासून शासन दरबारी सातत्याने मागण्या करीत, त्यासाठी संघर्ष करीत पाठपुरावा केला जातो आहे, परंतु सरकार दरबारी त्याकडे पूर्णतः दुर्लक्ष होत आले आहे. विशेषतः या तांत्रिक कर्मचाऱ्यांनी तांत्रिक वेतनश्रेणी लागू करावी, यासह अन्य मागण्यांकरीता न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने त्या संबंधीचा निर्णयसुध्दा दिला. परंतु, न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाची सरकार दरबारी दखल घेण्यात आली नाही, अशी खंत या आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. न्यायालयाने या कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यांसदर्भात नियुक्त केलेल्या सुधांशू समितीच्या शिफारशीसुध्दा सरकारने मंजूर केल्या नाहीत, लागू तर झाल्याच नाहीत. त्यामुळेच आता १८ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान कर्मचाऱ्यांनी अर्जीत रजा घेऊन सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरही न्याय न मिळाल्याने २ मार्च पासून या कर्मचाऱ्यांनी असहकार आंदोलन करीत कामबंद आंदोलनही सुरु केले, त्याकडेही लक्ष दिल्या गेले नाही, अशी खंत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

### विशेष आरोग्य तपासणी शिबीरातून १ हजार ६६८ मुलांची तपासणी :

### पाथरी तालुक्यात १२ गावांत आरोग्य शिबिरे; संकल्प मानव विकास संस्थेद्वारे उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी तालुक्यातील स्थलांतरित कामगारांच्या मुलांच्या आरोग्याच्या समस्या लक्षात घेऊन संकल्प मानव विकास संस्थेच्या वतीने २० ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत १२ गावांमध्ये विशेष आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरांमधून एकूण १ हजार ६६८ मुलांची सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली.

मसलातांडा, कानसुर, नाथरा, जवळाझुटा, बाबुलतार, टाकळगव्हाण, गुंज उमरा, पाथरगव्हाण बु., देवनांद्रा, बोरगव्हाण तसेच पाथरगव्हाण खु. या गावांमध्ये ही शिबिरे पार पडली. संकल्प संस्थेचे कार्यकारी संचालक सुधाकर क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिरांमध्ये स्थलांतरित मजुरांची मुले तसेच जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरांसाठी पाथरी तालुका आरोग्य विभागाने तज्ज्ञ डॉक्टर, एएनएम व एमपीडब्ल्यू कर्मचाऱ्यांची उपलब्धता करून सहकार्य केले. वैद्यकीय पथकाने मुलांमध्ये कुपोषण, रक्ताल्पता (ॲनिमिया), डोळ्यांचे विकार तसेच विविध संसर्गजन्य आजारांची तपासणी केली. ज्या मुलांना पुढील उपचारांची आवश्यकता आहे, त्यांना तज्ज्ञांकडून आवश्यक सल्ला देण्यात आला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प समन्वयक सावन जोंधळे, कार्यक्रम व्यवस्थापक विठ्ठल साळवे, समन्वयक बालासाहेब खोपे, उमेश कांबळे, शामल शेरकर, पूजा कदम व अशविनी डोंगरे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच संबंधित गावांतील सरपंच, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आणि गाव बाल संरक्षण समितीच्या सदस्यांनीही सहकार्य केले.

### महापालिकेच्या आगामी अर्थसंकल्पात विविध विकासकामांचा समावेश करावा : भाजपाच्या नगरसेवकांची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आगामी महानगरपालिका अर्थसंकल्पात विविध महत्त्वाच्या कामांचा समावेश करावा, त्यासंबंधीचा ठराव मंजूर करून तो शासनाकडे तसेच जिल्हा नियोजन समितीकडे पाठवावा, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या नगरसेवकांनी महापालिका आयुक्तांना सादर केलेल्या निवेदनात्रे केली आहे.

# शेतकऱ्यांसाठी संघर्ष सुरूच ठेवणार ॲड. काळे

**सोनपेठ ,/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेकडो कोटी रुपयांचा पिक विमा मिळवून दिल्याबद्दल ॲड. अजित काळे यांचा परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने शेळगाव महाविष्णु येथे भव्य सत्कार करण्यात आला

यावेळी बोलताना काळे यांनी शेतकऱ्यांसाठी न्यायालया सह रस्त्यावरील संघर्ष सुरुच ठेवणार असल्याचे सत्काराला उत्तर देताना सांगितले. सन २०२० मधील पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा व्हावी यासाठी परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने उच्च न्यायालयात निःशुल्क दावा लढवुन त्यांना शेकडो कोटी रुपये व्याजा सह मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणारे छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयातील जेष्ठ विधिज्ञ तथा शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड अजित काळे यांचा परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. सोनपेठ तालुक्यातील शेळगाव येथे शेतकरी हक्क परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालीदास आपेट होते,तर सुधीर बिंदु, अमृत शिंदे,बंडू सोळंके, दगडूबा वजीर, इरशाद चाँद पाशा, किरण चक्रपाणी, शिवाजी बोबडे, अनंत काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्ह्यातील अनेक शेतकरी, कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमात शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सातत्याने लढा देत पिक विमा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या ॲड. अजित काळे यांच्या कार्याचा जिल्ह्यातील शेतकरी



बांधवांच्या वतीने गौरव करण्यात आला.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ॲड. अजित काळे म्हणाले की, न्यायव्यवस्था कागदोपत्री प्रक्रियेवर चालत असली तरी सामान्य माणसाला न्याय मिळवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. पिक विमा हा शेतकऱ्यांवर कोणताही उपकार नसून तो केंद्र व राज्य शासनाचे कर्तव्य आहे. महाराष्ट्रातील पिक विमा योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होत असून मंत्री, अधिकारी व कर्मचारी यांची घरे भरली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.शासनाच्या योजना समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचतात की नाही, यावर लक्ष ठेवणारी स्वतंत्र यंत्रणा निर्माण झाली नाही, हे दुर्दैव असल्याचेही त्यांनी नमूद केले. शेतकरी संघटित नसल्यामुळे अनेक प्रश्न दुर्लक्षित राहतात. धाडसाने प्रश्न विचारणे आणि हक्कासाठी आवाज उठवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपण न्यायालयीन लढ्यासोबतच रस्त्यावरील संघर्ष ही सुरुच ठेवणार असल्याची ग्वाही त्यांनी सत्काराला उत्तर देताना दिली . शेतकऱ्यांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून आपल्या प्रश्नांसाठी एकत्र येणे आवश्यक असल्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमात शेतकरी चळवळीतील हेमचंद्र शिंदे, विश्वंभर गोरवे व कालीदास आपेट यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अवधुत गिरी यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेळगाव येथील ग्रामस्थांनी परीश्रम घेतले

## जागतिक महिला दिन: येलदरी जलविद्युत केंद्रात डॉ. सपना परतानी यांचा सन्मान

**जिंतूर,/ प्रतिनिधी :** जागतिक महिला दिन: येलदरी जलविद्युत केंद्रात डॉ. सपना परतानी यांचा सन्मान; वृक्षारोपण करून



निसर्ग संवर्धनाचा संदेश येलदरी वसाहत दि.(प्रतिनिधी): जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आज रविवार, ८ मार्च रोजी येलदरी येथील जलविद्युत केंद्र परिसरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परभणी येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सपना परतानी यांचा त्यांच्या कार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. सत्कारासोबतच त्यांच्या हस्ते विद्युत केंद्र परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी परभणी येथील नामांकित कार्डिओलॉजिस्ट (हृदयरोग तज्ज्ञ) डॉ. कौस्तुभ परतानी यांची प्रमुख उपस्थिती होती. महिला दिनानिमित्त स्त्री शक्तीचा सन्मान करतानाच निसर्गाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करणे ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्याला येलदरी जलविद्युत केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहात सहभाग नोंदवला. यावेळी विद्युत केंद्रातील:आदित्य पाठे (वरिष्ठ तंत्रज्ञ)रमेश भंडारी,प्रवीण मुळी महेंद्र लाटे,यांच्यासह इतर तंत्रज्ञ आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पर्यावरण आणि आरोग्याचा मेळ डॉ. सपना परतानी यांनी आपल्या सत्काराला उत्तर देताना सांगितले की, ''स्त्री ही समाजाचा कणा आहे आणि निसर्ग हा जीवनाचा आधार. महिला दिनी अशा प्रकारे निसर्गाची सेवा करण्याची संधी मिळणे हा मोठा आनंद आहे.'' येलदरी जलविद्युत केंद्र प्रशासनाच्या वतीने महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केल्याबद्दल उपस्थित सर्वांनी समाधान व्यक्त केले.

## पुर्णा येथे आशा दिवस उत्साहत साजरा

**पूर्णा /प्रतिनिधी-** जनता व आरोग्य विभाग यांच्यात महत्वाचा दुवा म्हणुन कार्यरत असलेल्या आशा स्वयंसेविकांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळाले, ग्रामीण भागातुन सहभागी आशाची आरोग्य सेवेतील विविध कौशल्यासह गीत गायन, काव्यवाचन, संभाषण व नेतृत्वगुणाची उपस्थितांना चुनुक दिसली.

तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने पंचायत समिती सभागृहात ०६ मार्च रोजी आशा दिवस उत्साहात साजरा करण्यात करण्यात आला. आशा दिनानिमित्त सकाळच्या संत्रामध्ये आशा स्वयंसेविकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. दुपारच्या सत्रामध्ये आशा स्वयंसेविकांसाठी प्रश्नमंजुषा, गीत गायन स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच कार्यक्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा स्वयंसेविकांना प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी नारायण मिसाळ यांची तर प्रमुख अतिथी म्हणुन प्रशासन अधिकारी विजया कुरुडे, विस्तार अधिकारी तुकाराम मंदाडे, व्हि.के.पुरी, वसंत इखे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना गटविकास अधिकारी नारायण मिसाळ यांनी ग्रामीण भागात आशा स्वंयेसेविका करत असलेल्या आरोग्य सेवेचा विशेषत: आशांनी कोविड काळात





दिलेले योगदान व आयुष्मान भारत कार्डची इकेवायसी करण्यासाठी केलेल्या कामाचा गौरव केला. समारोपीय सत्रामध्ये तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विद्यासागर पाटील मार्गदर्शन करतांना म्हणाले की, गावामध्ये गृहभेटी देऊन बालकांची काळजी घेणे, गरोदर मातेच्या नोंदणी पासुन प्रसुती पर्यंतची योग्य ती काळजी घेऊन आरोग्य सेवा देण्याची महत्वपुर्ण कामे आशाताई करीत असल्यामुळे माता व बालमृत्यु चे प्रमाण कमी होऊन संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण वाढले असुन आरोग्य सेवा सुविधांसोबतच ग्रामीण भागात आरोग्य विषयक कार्यक्रमामध्ये जनतेचा सहभाग वाढवण्यामध्ये महत्वाचा दुवा म्हणुन भुमिका निभावत आहेत. पुढे बोलतांना डॉ. पाटील म्हणाले की, आशा स्वयंसेविकांना एकत्र येण्याची संधी उपलब्ध व्हावी, आशा स्वयंसेविकेच्या सुप्तगुणांना वाव मिळावा तसेच आशा स्वयंसेविकेच्या भुमिका व जबाबदारीबाबत जनमानसात जागृती निर्माण व्हावी या शासन निर्णयाला अनुसरून तालूका स्तरावर आशा दिवस साजरा करण्यात येत असल्याचे सांगुन त्यांनी आशाच्या कार्याचा गौरव केला.

स्पर्धेत सहभागी आशाताईंनी उत्तम सादररीकरण केले. मान्यवरांच्या हस्ते स्पर्धा विजेत्या व कार्यक्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या आशा स्वयंसेविकांना प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौवरविण्यात आले. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करून व दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आरोग्य विभागाच्या वतीने उपस्थित मान्यवराचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व उपस्थितांचे आभार तालुका समुह संघटक माधव आवरगंड यांनी व्यक्त केले. पसायदान घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यसाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विद्यासागर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाऊसाहेब मुंढे, डॉ.मोहिनी कदम, सोनाली पैजणे, इर्शाद खान,संतोष कठाळे, दैवशाला कांबळे, ज्योती ढगे, अनुराधा पौळ, आदीनी पुढाकार घेतला.

## ६४७ लाभार्थ्यांना मिळाला विविध योजनांचा लाभ

### ब्राह्मणगाव येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' उत्साहात

**परभणी,/प्रतिनिधी :-** 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर (टप्पा-१)' अंतर्गत परभणी तालुक्यातील ग्रामीण मंडळातील मौजे ब्राह्मणगाव येथे शनिवारी समाधान शिबिर उत्साहात पार पडले. या शिबीरातून विविध विभागांमार्फत एकूण ६४७ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.

या शिबिरामध्ये महसूल विभागासह महिला व बाल विकास विभाग, पंचायत समिती, कृषी विभाग, पशुसंवर्धन विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय, भूमी अभिलेख विभाग, आरोग्य विभाग आदी विविध विभागांनी सहभाग घेतला. ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध शासकीय सेवांचा लाभ घेतला.

शिबिराच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्राह्मणगावच्या सरपंच गीता काळदाते या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले उपस्थित होते. यावेळी तहसीलदार डॉ. संदीप राजपुरे, पंचायत समिती सदस्य दिलीप काळदाते, जिल्हा भूमी अधीक्षक चौधरी, गटविकास अधिकारी रावसाहेब चकोर, तालुका कृषी अधिकारी विजय नांदे, उपाधीक्षक (भूमी अभिलेख) सुनील मोरे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सोनवणे, दुय्यम निबंधक भास्कर घुगे तसेच नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड उपस्थित होते. तसेच तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरामध्ये महसूल विभागामार्फत ३१ फेरफार प्रकरणे निकाली काढण्यात आली. ७/१२ दुरुस्ती संदर्भात १० अर्ज स्वीकारण्यात आले, तर ६५ डिजिटल ७/१२ उतारे व ६५ आठ-अ उतारे वितरित करण्यात आले. याशिवाय १८८ विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले तसेच २७ अर्ज सिंगल विंडो प्रणालीद्वारे निकाली काढण्यात आले. विविध विभागांमार्फत एकूण ६४७ लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला. तसेच लेक लाडकी, लाडकी बहीण व बाल संगोपन योजना यांसारख्या योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. पुरवठा विभाग व संजय गांधी निराधार योजनेमार्फत ५५ लाभार्थ्यांना लाभ वितरित करण्यात आला.

या शिबिरामध्ये नागरिकांना प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ मधील चुका दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीत ७/१२ व ८-अ उतारे वाटप, उत्पन्न, रहिवासी, जात व नॉन-क्रीमिलेयर प्रमाणपत्र, अकृषिक (एनए) बाबत मार्गदर्शन, सनद प्रकरणांची माहिती, तुकडेबंदी कायद्याशी

## तपत्या उन्हात शेख हुजेफ यांचा पहिला रोजा पूर्ण

**जिंतूर,/प्रतिनिधी-** मुस्लिम बांधवांचा पवित्र महिना रमजान सध्या



उन्हाळ्याच्या कडाक्यात सुरू झाला असून श्रद्धा, संयम आणि भक्तिभावाचे दर्शन शहरात घडत आहे. तपत्या उन्हातही उपवासाची परंपरा जपत जिंतूर शहरातील गुत्तेदार शेख कलीम अब्दुल रौफ यांचे चिरंजीव शेख हुजेफ कलीम यांनी आपल्या वयाच्या ०८ व्या वर्षी आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीरित्या पूर्ण केला.

पहाटे सहरी करून सुरू झालेला हा रोजा सायंकाळी इफ्तारपर्यंत तब्बल १२ ते १४ तास कोणतेही अन्न-पाणी न घेता पूर्ण करण्यात आला. वाढत्या उष्णतेतही हुजेफ यांनी दाखविलेल्या चिकाटीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

उवेस यांच्या या धार्मिक जिद्दीबद्दल मोठे वडील शेख सलीम, शेख अलीम (पत्रकार), हाजी अब्दुल आहाद, शेख मुसेफ, शेख अदनान,शेख बासीत, शेख तोसीफ,तसेच मामा, आत्या, मावशी आदी नातेवाईकांनी अभिनंदन करून पुढील रोजांसाठी शुभेच्छा दिल्या. रमजान महिन्यात उपवासासोबत नमाज, कुरआन पठण आणि दानधर्माला विशेष महत्त्व असते. शहरातही या पवित्र महिन्याची सुरुवात भक्तिमय वातावरणात झाली असून मुस्लिम समाजात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## सेलू येथील प्रिन्स इंग्लिश स्कूलमध्ये महिला संरक्षण कायदे विषयावर मार्गदर्शन संपन्न

**सेलू ,/प्रतिनिधी:** परभणी जिल्हा भाजपा महिला आघाडी, कृषी उत्पन्न बाजार समिती सेलू व श्रीराम प्रतिष्ठान सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सेलू येथील प्रिन्स इंग्लिश स्कूलमध्ये महिला संरक्षण कायदे या विषयावर विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन (ता. ७) वार शनिवार रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या उद्घाटक मनीषा जाधव -महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष महानगर प्रमुख पाहुणे डॉ. संजय रोडगे,सभापती कृ. ऊ. बा स. सेलू. सारिका पारवे महिला मोर्चा जिल्हा अध्यक्ष ग्रामीण, रुपाली ठाकूर उपाध्यक्ष महानगर परभणी, वैष्णवी कुलकर्णी -जिंतूर शहर अध्यक्ष, अपर्णा जोशी, दिपाली वाघ, निर्मला लिपणे, संध्या चिटणीस, ज्योती मोगल, बबिता ठाकूर, मंगल मुसळे, मोनिका देशमुखसुलभा धुळे, रेखा माणेरे उपस्थित होत्या. या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर आणि मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक मा. ॲड. रोहिणी बोराडे यांनी उपस्थित महिलांना भारतीय संविधानाने आणि कायद्याने दिलेल्या विविध हक्कांची सविस्तर माहिती दिली. पालकांनी मुलांशी मोकळेपणाने संवाद साधणे त्यांना चांगल्या वाईट स्पर्शाची माहिती देणे, स्त्री संरक्षणासाठी फक्त कायदे महत्वाचे नसून नैतिक मूल्य व संस्कार ची जोपासना करणे महत्त्वाचे आहे, सोशल मीडियाचा गैरवापर, कौटुंबिक हिंसाचार, कामाच्या ठिकाणी होणारा छळ आणि सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदींवर त्यांनी प्रकाश टाकला. त्याचबरोबर पोक्सो कायदा म्हणजे काय त्याचा उद्देश, त्याची गोपनीयता व निष्कर्ष याविषयी मार्गदर्शन केले ''महिलांनी स्वतःच्या हक्कांप्रती जागरूक राहणे ही



काळाची गरज आहे,'' असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाला शहरातील महिला व विद्यार्थीनीचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभ घेत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. संघर्ष रागिणी उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

# थंडावले विलीनीकरणाचे वारे...

## रोखठोक

दिनेश गुणे

संसदेच्या राज्यसभेतील शरद पवार यांची उपस्थिती आणि कामगिरी या बाबी गेल्या काही वर्षांत चर्चेचा विषय ठरल्या आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात दीर्घकाळ प्रभावशाली राहिलेल्या नेत्याकडून संसदीय कामकाजातही महत्त्वाची भूमिका अपेक्षित असते. परंतु गेल्या काही वर्षांच्या संसदीय आकडेवारीकडे पाहिले, तर राज्यसभेतील त्यांची भूमिका प्रत्यक्ष कामगिरीची आहे की केवळ प्रतीकात्मक उपस्थितीची होती, यावरच चर्चा होताना दिसते. शरद पवार यांनी आता सक्रिय राजकारणातून निवृत्ती घ्यावी आणि मार्गदर्शकाची भूमिका स्वीकारून नव्या कार्यकर्त्यांना संधी द्यावी, अशी भूमिका मांडत अजित पवार यांनी शरद पवार यांच्या राजकारणातील सक्रियतेवर जाहीर नाराजी व्यक्त केली होती. याच कारणामुळे ते पक्षातून बाहेर पडले होते. त्यामुळेच आता राज्यसभेच्या नव्या निवडणुकीत सहा वर्षांकरिता शरद पवार यांची बिनविरोध निवड झाल्याने, त्यांच्या संसदीय कामगिरीचा आणि राजकारणाचा आढावा घेतला जाणे साहजिकही आहे.

भारतीय राजकारणात २०१४ नंतरच्या कालखंडात, विशेषतः मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून मोठे बदल झाले. केंद्रात भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व वाढले आणि इंडिया आघाडीच्या झेंड्याखाली एकत्र येऊनही विरोधी पक्षांची ताकद तुलनेने कमी झाली. अशा परिस्थितीत विरोधी बाकांवरील अनुभवी नेत्यांकडून संसदीय चर्चांमध्ये अधिक आक्रमक आणि प्रभावी हस्तक्षेप अपेक्षित असतो. विशेषतः चार दशकांहून अधिक काळ सत्तेच्या केंद्रस्थानी राहिलेल्या शरद पवार यांच्याकडून अशी अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. शरद पवार यांनी संसदीय राजकारणात प्रवेश केला, त्यास आता जवळपास सहा दशके उलटली आहेत. उपलब्ध संसदीय आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत पवार यांची राज्यसभेतील उपस्थिती साधारण ७० ते ७५ टक्क्यांच्या आसपास राहिली आहे. राज्यसभेतील सरासरी उपस्थितीच्या तुलनेत ही उपस्थिती विशेष उल्लेखनीयही नसली, तरी त्यांच्या वयाचा विचार करता ही उपस्थिती समाधानकारक म्हणता येईल. कारण उपस्थिती हा संसदीय कामकाजातील सहभागाचा एकमेव मापदंड नसतो. सभागृहातील चर्चांमधील सहभागाच्या बाबतीत शरद पवार यांची कामगिरी अत्यंत मर्यादित दिसते. कृषी, सहकार, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि संघराज्यीय प्रश्न यांसारख्या विषयांवर त्यांनी काही चर्चांमध्ये आपली मते मांडली. कृषी क्षेत्रातील त्यांचा दीर्घ अनुभव लक्षात घेता या विषयावरील त्यांची मते अनेकदा गांभीर्याने ऐकली गेली. मात्र, संसदेतील नियमित आणि सातत्यपूर्ण सहभागाच्या निकषावर पाहिले तर त्यांची सक्रियता फार मोठी नाही. सभागृहातील प्रश्नोत्तराचा तास हा सरकारला जनहिताच्या मुद्द्यांवर भूमिका घेण्यास भाग पाडण्याचे विरोधकांचे महत्त्वाचे संसदीय आयुध असते, असे मानले जाते. प्रश्न विचारणे हा सरकारला जबाबदार धरण्याचा एक प्रभावी मार्ग मानला जातो. अनेक खासदार आपल्या राज्याशी संबंधित प्रश्न या माध्यमातून मांडतात. या निकषावरही पवार यांची भूमिका अत्यंत मर्यादित असल्याचे दिसते. खाजगी विधेयकांच्या बाबतीतही शरद पवार फारसे सक्रिय दिसले नाहीत. संसदेतील खाजगी विधेयके मंजूर होण्याची शक्यता मुळातच अत्यल्प असली, तरी अनेक खासदार धोरणात्मक मुद्दे पुढे आणण्यासाठी त्यांचा वापर करतात. पवार यांनी मात्र या साधनाचा फारसा उपयोग केलेला नाही.

भाजपाला समर्थ राजकीय पर्याय देण्यासाठी महत्प्रयासाने एकत्र आलेल्या इंडिया आघाडीच्या राजकीय कसोटीच्या काळातही, शरद पवार यांची राजकीय शैली नेहमीच थेट संघर्षापेक्षा संवाद आणि तडजोडीवर आधारित राहिली आहे. राहुल गांधी यांच्यासारखे काँग्रेसचे नेते रालोआ सरकारवर तुटून पडण्याची रणनीती आखत असताना शरद पवार यांनी मात्र मर्यादित भूमिका घेतली. त्यामुळे संसदेत आक्रमक राजकीय नेतृत्व करण्याऐवजी निवडक मुद्द्यांवरच बोलणाऱ्या शरद पवार यांच्या इंडिया आघाडीतील सहभागावरही संशयाची वलये वारंवार उमटली. पवार यांची ही शैली म्हणजे त्यांच्या अनाकलनीय राजकारणाची, संधिसाधूपणाची आणि सत्तेच्या सहवासात राहण्याच्या तडजोडीच्या राजकारणाची खूण आहे, असे काहींना वाटत असले, तरी संसदीय सक्रियतेच्या निकषांवर मात्र ही शैली अपुरी ठरली आहे. शरद पवार यांच्या राजकीय कारकीर्दीचा सध्याचा टप्पाही लक्षात घ्यावा लागतो. दीर्घकाळ सक्रिय राजकारण केल्यानंतर ते आता ज्येष्ठ नेत्यांच्या भूमिकेत आहेत. त्यामुळे रोजच्या संसदीय संघर्षात आघाडीवर दिसण्याऐवजी राजकारणात सक्रियही असावे आणि सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणूनही काम करावे, ही स्वयंघोषित भूमिका त्यांनी स्वीकारल्याचे दिसते. ही भूमिका काही प्रमाणात स्वाभाविक असली, तरी लोकप्रतिनिधी म्हणून सक्रिय संसदीय सहभागाची अपेक्षा मात्र कायम राहते. म्हणूनच राज्यसभेतील शरद पवार यांची अलिकडच्या काळातील उपस्थिती ही प्रभावी कामगिरीची आहे की केवळ प्रतीकात्मक अस्तित्वाची आहे, यावर चर्चा होत असते. याचे उत्तर कदाचित या दोन्हीच्या मध्यावर आहे. अनुभवी नेतृत्वाची सावली संसदेवर असणे महत्त्वाचे असते; परंतु त्या सावलीला अधिक सक्रिय रूप मिळाले, तर संसदीय लोकशाही अधिक समृद्ध होऊ शकते.

भारतीय राजकारणात दीर्घ अनुभव, सत्तेतील आणि विरोधातील अशा दोन्ही भूमिकांचा मोठा इतिहास आणि राजकीय समीकरणे ओळखण्याची क्षमता यामुळे शरद पवार हे नाव नेहमीच चर्चेत राहिले. विशेषतः केंद्रातील भाजपाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या विरोधात उभ्या राहिलेल्या, इंडिया आघाडी या विरोधी पक्षांच्या आघाडीत त्यांची भूमिका काय होती, हा प्रश्न गेल्या काही वर्षांत वारंवार चर्चेत आला. संसदेत सरकारला कोंडीत पकडण्याच्या अनेक प्रसंगांमध्ये पवार यांची भूमिका आक्रमक राजकीय नेतृत्वापेक्षा अनुभवी रणनीतीकाराची अधिक दिसून आली.



इंडिया आघाडीची कल्पना प्रत्यक्षात येण्याआधीच विरोधी पक्षांमध्ये संवाद वाढविण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. प्रादेशिक पक्षांचे महत्त्व वाढलेल्या भारतीय राजकारणात विविध विचारसरणींच्या पक्षांना एकत्र आणणे हे अत्यंत अवघड काम असते. या पृष्ठभूमीवर पवार यांचा अनुभव उपयोगी पडू शकतो, अशी अपेक्षा अनेक पक्षांना होती. विविध पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे दीर्घकालीन संबंध असल्यामुळे ते अनेकदा संवादाचा दुवा म्हणून पुढे आले. तथापि, संसदेत सरकारला थेट कोंडीत पकडण्याच्या बाबतीत त्यांची भूमिका मर्यादित दिसली. कृषी कायद्यांवरून देशभरात मोठे आंदोलन उभे राहिले तेव्हा विरोधी पक्षांनी सरकारवर तीव्र हल्ला चढवला. त्यावेळी पवार यांनी या विषयावर आपली भूमिका मांडली, परंतु त्यांनी आंदोलनाला पूर्णपणे राजकीय आक्रमकतेचे रूप देण्याऐवजी संवादाची भूमिका मांडली. कृषी क्षेत्रातील त्यांचा अनुभव मोठा असला, तरी ते मवाळ भाषेत बोलताना दिसले. आर्थिक आणि कॉर्पोरेट व्यवहारांशी संबंधित काही वादग्रस्त मुद्द्यांवर विरोधी पक्षांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. या काळात एका उद्योग समूहावरील आरोपांवरून संसदेत मोठा राजकीय संघर्ष निर्माण झाला. अनेक विरोधी पक्षांनी संयुक्त संसदीय समितीची मागणी करीत सरकारवर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला. पवार यांची या मुद्द्यावरील काहीशी मवाळ भूमिका आणि नंतरही त्यांनी याच उद्योग समूहाविषयी दाखविलेली जवळीक यामुळे त्यांच्याविषयी इंडिया आघाडीत काहीसे शंकेचे वातावरण राहिले, त्यांच्या काही वक्तव्यांमुळे विरोधकांच्या एकसंध रणनीतीला धक्का बसल्याची आणि पवार यांचे राजकारण सत्तारूढ भाजपाला अनुकूल असल्याची टीकाही झाली. शरद पवार हे क्वचितच अतिशय टोकाची भूमिका घेतात. अनेकदा ते पडद्यामागे राहून संवाद साधण्यावर विश्वास ठेवतात, संसदेतल्या तीव्र राजकीय संघर्षाच्या काळातही ते समन्वय साधण्याचा प्रयत्न करतात, असेही बोलले जाते. ही शैली अनुभवी नेतृत्वाचे लक्षण असले, तरी काहींच्या मते ती आक्रमक विरोधी राजकारणासाठी अपुरी ठरते व विरोधकांच्या बाकावरील सत्ताधाऱ्यांचा छुपा संकटमोचक म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. विरोधी पक्षांच्या आघाडीमध्ये अनेकदा विचारसरणीचे आणि प्रादेशिक हितसंबंधांचे संघर्ष असतात, हे राजकीय वास्तव आहे. अशा परिस्थितीत एखाद्या नेत्याने सर्वांना एकत्र ठेवणे ही मोठी जबाबदारी असते. पवार यांनी अनेक प्रसंगांमध्ये ही भूमिका निभावण्याचा प्रयत्न केला. मात्र संसदेत सरकारला थेट आणि सातत्याने अडचणीत आणणारे नेतृत्व त्यांनी घेतल्याचे फारसे दिसत नाही.

यामागे आणखी एक कारण म्हणजे त्यांच्या राजकीय कारकीर्दीची सध्याची अवस्था. दीर्घ राजकीय प्रवासानंतर ते आज ज्येष्ठ नेत्याच्या भूमिकेत आहेत. शिवाय, अजित पवार यांनी स्वतंत्र गट स्थापन करून सत्ताधारी रालोआसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने शरद पवार काहीसे एकाकी पडलेले दिसत आहेत. कदाचित त्यामुळे रोजच्या संसदीय संघर्षात आघाडीवर दिसण्याऐवजी सल्लागार आणि मार्गदर्शक म्हणून काम करण्याचा मवाळ मार्ग त्यांनी स्वीकारला असावा. अनेक तरुण किंवा मध्यमवयीन नेते आक्रमक विरोधी राजकारणाचे नेतृत्व करीत असताना पवार यांची भूमिका अधिक शांत आणि संयमी राहते. म्हणूनच शरद पवार यांचे पुढील सहा वर्षांसाठी राज्यसभेत असणे विरोधकांच्या आघाडीसाठी खरोखरीच किती फायद्याचे, याची चर्चा आता सुरू होणार आहे. मुळात शरद पवार यांच्या नावावर विरोधकांच्या महाविकास आघाडीचे एकमेव विजयाची खात्री असलेले उमेदवार म्हणून शिक्कामोर्तब होण्याआधीचे महाविकास आघाडीतील राजकारण पाहता, पवार हे या आघाडीचे नाईलाजाचे एकमत असावे, असेच दिसते. काँग्रेसकडे अन्य नेत्याचे नाव नाही, शिवसेनेमध्ये उमेदवारीबाबत मतभेद होते. राज्यसभेसाठी प्रियांका चतुर्वेदी किंवा शरद पवार यांच्यामधून एक पर्याय निवडायचा असताना संजय राऊत यांनी पवार यांना झुकते माप देण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लावली होती. त्यामागे त्यांच्या दीर्घकालीन राजकारणाची काही गणिते दडलेली आहेत, हे स्पष्ट आहे. आणखी काही महिन्यांत उद्धव ठाकरे यांची विधान परिषद सदस्यत्वाची मुदत संपेल, तेव्हा त्यांचा या सभागृहातील फेरप्रवेशाचा मार्ग निर्धोक करावयाचा असेल तर आता शरद पवार यांच्या उमेदवारीस पाठिंबा देण्याखेरीज पर्याय नाही, हे ठाकरे यांच्या गळी उतरविण्यात संजय राऊत यशस्वी झाल्यावर काँग्रेसलाही नाईलाजाने पवार यांच्या उमेदवारीस पाठिंबा द्यावा लागला आहे. आता राज्यसभेत पवार कुटुंबातील दोन सदस्य, लोकसभेत एक सदस्य आणि महाराष्ट्राच्या विधिमंडळात दोन सदस्य असल्याने महाराष्ट्राच्या सत्ताधारी आणि विरोधी राजकारणावर पवार कुटुंबाची पुरती छाया दाटलेली दिसते. शरद पवार यांच्या प्रसंगी तडजोडीच्या आणि सध्याच्या मवाळ राजकारणाचाच हा परिणाम म्हणावा लागेल.

एकंदरीत पाहता, शरद पवार यांनी इंडिया आघाडीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली असली, तरी ती मुख्यतः समन्वय आणि रणनीतीची राहिली आहे. सरकारला संसदेच्या पटलावर थेट कोंडीत पकडण्याच्या मोहिमेत ते अग्रभागी दिसले नाहीत. परंतु विविध पक्षांना एकत्र ठेवण्याचा आणि दीर्घकालीन राजकीय गणिताचा विचार मांडण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आजच्या तीव्र ध्रुवीकरणाच्या राजकारणात आक्रमकता आणि संवाद या दोन्ही गोष्टींची गरज असते. पवार यांची शैली दुसऱ्या प्रकारात मोडते. त्यामुळे प्रश्न असा उरतो की, विरोधी राजकारणाला केवळ आक्रमक नेतृत्वाची गरज आहे की अनुभव आणि समन्वयाचीही गरज आहे, या प्रश्नाचे उत्तर शोधताना पवार यांच्या सध्याच्या मवाळ भूमिकेकडे पाहणे महत्त्वाचे ठरते. राज्यसभेचा उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर शरद पवार यांनी शुक्रवारी महाराष्ट्राच्या जनतेचे आभार मानणारे पत्रक समाजमाध्यमातून जारी केले. लोकप्रतिनिधी म्हणून १९६७ पासून सुरू झालेला हा प्रवास आजही, पवार यांनी या वयातही सुरू ठेवला आहे. या प्रवासाचे श्रेय ते स्वतःकडे न घेता महाराष्ट्राच्या जनतेस देतात. महाराष्ट्राच्या जनतेने दाखविलेल्या विश्वासामुळे आणि पाठिंब्यामुळेच हा प्रवास अखंडपणे सुरू आहे, असे ते नमूद करतात. पुढील सहा वर्षांकरिता राज्यसभेत पाठवून जनतेने आपल्याला महाराष्ट्राची सेवा करण्याची संधी दिली आहे. दीर्घकाळ, किंबहुना आयुष्यभर अशा सेवेची संधी राजकारणात क्वचितच कोणास मिळत असते. आता पुढील सहा वर्षांचा राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ मोजता, पवार यांची संसदीय राजकारणाची सहा दशके पूर्ण होतील. पवार यांना महाराष्ट्राने त्यापुढेही सेवेची संधी दिली, तर संसदीय राजकारणातील अमृत महोत्सव साजरा करणारा नेता अशी विक्रमी नोंदही त्यांच्या नावे केली जाईल. पवार यांनी राजकारणातून निवृत्त व्हावे आणि मार्गदर्शकाची भूमिका वठवून नव्या नेतृत्वास संधी द्यावी, अशी जाहीर अपेक्षा अजित पवार यांनी व्यक्त केली होती. मात्र, विलीनीकरणाची चर्चा सुरू झाल्यानंतर अजित पवार यांच्या पश्चात त्यांच्या नव्या अपेक्षांचे अनेक गौप्यस्फोट सुरू झाले. शरद पवार यांनी राज्यसभेत जावे अशी अजित पवार यांचीच इच्छा होती, असा दावा आमदार रोहित पवार यांनी केला. आता शरद पवार यांचा राज्यसभा प्रवेश निर्धोक झाल्यानंतर विलीनीकरणाच्या चर्चेचे वारे थंडावले आहेत. पवार यांना राज्यसभेत पाठविण्याचा पर्याय स्वीकारून महाविकास आघाडीने आपले वर्तमान आणि भविष्य सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शरद पवार राज्यसभेत दाखल झाल्याने सत्ताधारी रालोआची राजकीय गणितेदेखील मनासारखी जुळून आली आहेत. काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेच्या हाती काय पडले, याची चर्चा कालांतराने सुरू होईल, तेव्हा त्याची उत्तरेदेखील स्पष्ट झालेली असतील.

dineshgune@gmail.com

## प्रासंगिक

अन्नपूर्णा देवी

## सेवा-शुश्रूषाविषयक अर्थव्यवस्था; महिला नेतृत्व विकासाचा पाया



भारताच्या जडणघडणीला महिलांच्या कर्तृत्वानं आकार दिला आहे. आज भारतीय महिलांनी देशाच्या परिवर्तनात आघाडी घेतली आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित, संरक्षण आणि प्रशासनासह सर्व क्षेत्रांत त्या प्रगती करीत आहेत. लढाऊ वैमानिकांपासून ते तळागाळातील नेतृत्वापर्यंत सर्वसमावेशक आणि शाश्वत राष्ट्रीय प्रगतीच्या त्या कारक घटक बनल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, भारताने महिलांकडे केवळ लाभार्थी म्हणून पाहण्याचा पारंपरिक दृष्टिकोन सोडून दिला असून त्यांना विकास प्रक्रियेचे नेतृत्व करणाऱ्या आणि विकासाच्या कारक घटक म्हणून ओळख दिली आहे.

लोकांच्या नजरेत भरणाऱ्या प्रत्येक कामगिरीच्या पाठीशी एक मूक शक्ती असतेच; ती म्हणजे सेवा-शुश्रूषाविषयक अर्थव्यवस्था. कामाच्या ठिकाणी पाऊल ठेवण्याआधी, आपल्या कुटुंबाच्या पालन पोषणाच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी पहाट होण्याआधीच उठणारी आई ही स्त्रीच. प्रतिकूल परिस्थितीतही कुटुंबाची मोट बांधून ठेवणारी पत्नी म्हणजे स्त्रीच असते. वृद्ध पालकांची सेवा आणि आपल्या कामांमध्ये समतोल साधणारी कन्या ही देखील स्त्रीच. खरे तर या कष्टांना जमेस धरले जातच नाही. तरीही अगदी शांतपणे आपली घरे, आपले समुदाय आणि आपल्या देशाची काळजी महिलांद्वारे वाहिली जाते. या सगळ्याची दखल घेऊन केंद्र सरकार सर्वसमावेशक प्रगतीचा पाया म्हणून सेवा-शुश्रूषाविषयक कामांचे मोल जपण्यासाठी, त्यांना पाठबळ देण्यासाठी आणि त्यांच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहे.

भारताचा मनुष्यबळातील महिला श्रमशक्तीच्या सहभाग दर २०१७-१८ मधील २३.३ टक्के तुलनेत वाढला असून २०२३-२४ मध्ये तो ४१.७ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. यातून महिलांच्या विस्तारत असलेल्या आर्थिक क्षमतेची प्रचीती येते. आर्थिक पाहणीत अधोरेखित केल्याप्रमाणे, मनुष्यबळातील महिलांचा मोठा सहभाग आणि मजबूत स्थितीतील सेवा-शुश्रूषाविषयक सेवांमुळे महिलांसाठी संधींची लाखो दारे खुली होऊ शकतील.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये देखभाल व्यवस्था मजबूत करण्यासाठी ऐतिहासिक गुंतवणूक करण्यात आली आहे. महिलांसाठीच्या तरतुदीने पहिल्यांदाच ५ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार केला आहे. यातून महिला केंद्रित विकासाची सरकारची दृढ वचनबद्धता दिसून येते. १.५ लाख आशा सेविकांचे प्रशिक्षण, महिला वसतिगृहांचा विस्तार, बालकांच्या उत्तम देखभालीसाठी अंगणवाडी केंद्रांचे आधुनिकीकरण आणि आरोग्य व पोषण प्रणालींच्या समन्वयाचे मजबुतीकरण असे उपक्रम संपूर्णपणे सरकारी सहभागातून राबविले जात आहेत. सामाजिक सुरक्षा व रोजगाराच्या ठिकाणी सुरक्षितता याबाबतची नियमावली, आरोग्य व कामाच्या ठिकाणी असलेल्या वातावरणाबाबतची नियमावली यासारख्या कायदेशीर सुधारणांमुळे पाळणाघरे व कामगार कल्याणाची सुविधा भक्कम होत आहे. बालकांची देखभाल ही आर्थिक न्याय व कामातील सहभाग यासाठी महिलांना सक्षम करणारी बाब आहे, हे ओळखून या कायदेविषयक सुधारणा करण्यात आल्या आहेत. भारताच्या एकूण लोकसंख्येतील महिला व मुलांचे प्रमाण ६५ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. वाजवी दरातील व दर्जेदार बालसंगोपन सुविधांमधील गुंतवणुकीमुळे वेळेआधी विकास, मातांची आकांक्षापूर्ती यासाठी मदत मिळते आणि सशक्त देशाचा पाया रचला जातो. वाढते शहरीकरण, स्थलांतर आणि छोट्या कुटुंबांच्या संख्येतील वाढ यामुळे पारंपरिक बालसंगोपन पद्धतीत बदल होत आहेत आणि सहज उपलब्ध, परवडणाऱ्या आणि दर्जेदार बालसंगोपन व कौटुंबिक सेवांचे महत्त्व वाढत आहे. सेवा-शुश्रूषाविषयक अर्थव्यवस्थेतील गुंतवणुकीमुळे विविध राष्ट्रीय प्राधान्यक्रमांनाही चालना मिळते. महिला सक्षम होतात, बालविकासाला चालना मिळते, ज्येष्ठांच्या देखभालीत मदत होते आणि सन्मानजनक रोजगारांची निर्मिती होते. देखभाल प्रणालीच्या संस्थांची निर्मिती होते तेव्हा महिलांना कामाची संधी मिळते, कुटुंबात स्थैर्य येते आणि देशाच्या विकासाला गती मिळते. विकसित भारत २०४७ या उद्दिष्टाकडे देश वाटचाल करीत असताना, आपण एक मूलभूत सत्य समजून घेतले पाहिजे. शाश्वत विकासाचा पाया सशक्त समाज असतो. सेवा-शुश्रूषाविषयक अर्थव्यवस्था हा त्यापैकी एक आहे. या जागतिक महिला दिनानिमित्त संगोपनातील महिलांच्या कामाचे मोल ओळखून त्याला पाठिंबा देणे व त्यांच्या सशक्तीकरणासाठी आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करूया.

(लेखिका केंद्र सरकारच्या महिला व बालविकास मंत्री आहेत)

## रविवारची पत्रे

### महिलांच्या सन्मानाचा दिवस

जगभरात ८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. संपूर्ण वर्षातील हा एक दिवस महिलांना समर्पित केला जातो. हा दिवस प्रत्येक महिलेसाठी सन्मानाचा, अभिमानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. या दिनी कर्तृत्ववान महिलांच्या कार्याची दखल घेतली जाऊन त्यांना विविध ठिकाणी सन्मानित केले जाते. स्त्री ही गृहिणी असो वा नोकरी करणारी असो, ती आपल्या घरच्या जबाबदाऱ्या लीलया पार पाडते. स्त्री, आई, बहीण, मुलगी, पत्नी म्हणून प्रत्येक क्षणी सर्वस्वाचा त्याग करण्यास ती तयार असते. आजकाल महिलांनी सर्वच क्षेत्र काबीज केली आहेत. असं एकही क्षेत्र नाही की, त्यात महिलांनी आपला ठसा उमटवलेला नाही. प्रत्येक ठिकाणी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलांनी पुरुषांपेक्षा सरस कामगिरी केलेली आहे. स्त्रीविना घराला घरपण नसते. स्त्रीमध्ये घराला जोडून ठेवण्याची अनोखी शक्ती असते. ती नेहमी आपल्या कुटुंबासाठी जगत असते म्हणूनच हा एक दिवस फक्त तिच्यासाठी असतो. आजच्या आधुनिक काळातील स्त्री ही कुणापेक्षाही कमी नाही. आजही स्त्रियांना स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागतो. तिच्या या प्रयत्नांमध्ये तिचा उद्याचा प्रवास दडलेला आहे. करीअर, शिक्षण, कुटुंब यापलीकडेही जाऊन तिला तिचं अस्तित्व ठरवायचं आहे. स्वतःच्या पायावर ती कधीच उभी राहिली आहे. महिलांप्रति आपल्या जाणिवा कायमच संवेदनशील ठेवायला हव्यात आणि त्यांचं समाजातलं योगदान मान्य करायला हवे.

**जयदीप सुधीर हिरवे** / पुणे-९०९६२७६४८३

### परीक्षांना सामोरे जाताना...

दहावी-बारावीच्या परीक्षा जवळपास आटोपल्या असून आता कॉलेजच्या परीक्षांचे दिवस आहेत. पदवी-पदव्युत्तर परीक्षांच्या निकालानंतर काय, असा प्रश्न अनेक विद्यार्थ्यांना भेडसावत असतो. मानसशास्त्रीयदृष्ट्या विचार केल्यास प्रत्येक विद्यार्थ्याने चांगल्या आयुष्यासाठी स्वप्नं पाहणं आवश्यक आहे. स्वप्नांचं रूपांतर विचारात आणि विचारांचे कृतीत होतं. विद्यार्थ्यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन मात्र खरोखरच सकारात्मक आहे, हे मान्य करावचं लागेल. असे असले, तरी विद्यार्थ्यांसाठी तो फक्त परीक्षांपुरता मर्यादित असू नये. आपण जे शिकत आहोत त्याचा वापर परीक्षेव्यतिरीक्त जीवनात कसा करता येईल, याचा विचार व्हावा. काही परीक्षेत चांगले गुण मिळवतात, पण प्रत्यक्षात प्रात्यक्षिक ज्ञान काहीच नसतं. या जगात वावरताना माणसाने अपडेट राहिलं पाहिजे. म्हणूनच विद्यार्थ्याने अभ्यासाबरोबरच स्वावलंबन, श्रम, सेवा, सहकार्य आणि त्याग ही जीवनमूल्यं शिकायला हवीत. आवड जोपासावी. गुरूचं प्रत्येकाच्या आयुष्यात महत्त्व अनन्यसाधारण असतं. त्यांनी सांगितलेल्या, शिकवलेल्या प्रत्येक गोष्टीचा उपयोग आयुष्यात पदोपदी होतो. त्यामुळे शिक्षकांच्या आज्ञेचं पालन करणे गरजेचं आहे. आयुष्यातला महत्त्वाचा टप्पा असणारी विद्यार्थिदशा ही उज्ज्वल भविष्य साकारण्यासाठी कारणीभूत ठरते. एकदा हा टप्पा निघून गेला की, मूलभूत आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्वचितच वेळ मिळतो. त्यामुळे आपला सर्वांगीण विकास कसा होईल, याकडे लक्ष द्यायला पाहिजे. 'वेळेचं नियोजन' हा एकच रामबाण उपाय आहे. ऐन तारुण्यात असणाऱ्या विद्यार्थ्यांचे बाहेरील जगाशी संबंध वाढल्याने त्यांचा अभ्यासातला कल कमी होतो. जर मनोरंजनासोबतच अभ्यासालाही पुरेसा वेळ दिला तर भविष्याच्या वाटेवरच्या अडचणी कमी होतील. कॉलेज जीवनात त्याच्या जीवनाला वेगळंच वळण येतं. करीअरचे अनेक पर्याय असतात. विद्यार्थी काहीसा गोंधळून जातो. स्वतःच्या आवडीनुसार, ज्या विषयात आपल्याला रस आहे अशा गोष्टींची निवड करणारे विद्यार्थी काही मोजकेच असतात. हे विद्यार्थी स्वतःच्या कलागुणांना वाव देत शिक्षण घेतात. विद्यार्थ्याकडे निर्णय घेण्याची क्षमता असावी. कॉलेजच्या विविध उपक्रमांमध्ये, स्पर्धांमध्ये सहभागी होऊन स्वतःचं स्थान निर्माण करावं. पाल्याचे आयुष्य अधिकाधिक वास्तववादी होण्यासाठी पालकांचीही भूमिका तितकीच महत्त्वाची आहे.

**प्रमोद तिजारे** /८७६७१७७०८९

### विकासाच्या परिघाबाहेर आदिवासी समाज

रानावनात, जंगलात व डोंगरकडेकपारीत राहणाऱ्या भारतीय आदिवासी जमातींचं जीवन अत्यंत खडतर आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारकडून अनेक योजना, कायदे आणि कार्यक्रम राबविले जातात. मात्र, या योजनांमधून आदिवासी समाजाचे प्रश्न कितपत सुटतात, याचं वस्तुनिष्ठ मूल्यमापन क्वचितच केलं जातं. कागदावर दाखवलेली प्रगती आणि प्रत्यक्षातलं वास्तव यात मोठी दरी आहे. आदिवासी वनहक्क कायदा हा अत्यंत महत्त्वाचा असून दोन दशके उलटली तरी या कायद्यामुळे आदिवासी समाजाच्या जीवनात आमूलाग्र बदल झाल्याचं चित्र दिसत नाही. यासोबतच दुर्गम आदिवासी भागात सेवा देण्याबाबत शासकीय नोकरवर्गाची उदासीनता एक गंभीर प्रश्न आहे. शिक्षण, आरोग्य, महसूल किंवा सामाजिक कल्याण कोणत्याही विभागात आदिवासी भाग 'साईड पोस्टिंग' म्हणून पाहिला जातो. प्रशासनच जर या भागांपासून दूर राहिलं, तर शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचेल, अशी अपेक्षा कशी करायची? आदिवासी समाजाचा विकास साधायचा असेल तर कायदे आणि योजनांबरोबरच जनजागृती आणि शिक्षण या दोन घटकांवर भर देणं अपरिहार्य आहे. आजही अनेक आदिवासी दुर्गम भागांत मूलभूत शैक्षणिक सोयी उपलब्ध नाहीत. भाषेची अडचण आणि व्यापक जनजागृतीचा अभाव यामुळे महाराष्ट्र, छत्तीसगड आणि ओडिशामधील काही अपवाद वगळता आदिवासी समाजाची स्थिती चिंताजनक आहे. आदिवासींना खऱ्या अर्थाने मुख्य प्रवाहात आणायचं असेल, तर त्यांना दयेचा नव्हे तर हक्काचा विकास मिळायला हवा.

**अमोल आढळकर** /९७६५९६९६३०

### महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न



देशातील महिलांची परिस्थिती पाहिल्यावर त्या देशाची स्थिती कशी आहे ते ठरत असते. स्त्रियांचे महत्त्व आजही आपल्या भारतीय समाजात जसे आहे तसेच आहे. आज महिलांवर सर्व क्षेत्रात अपमान, अत्याचार, बलात्कार, विनयभंग, हुंडाबळी, अपहरण, लैंगिक छळासाठी प्रयत्न करणाऱ्या नराधमांची संख्या कुठे ना कुठे वाढत आहे. हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून समाजाकरिता लाजिरवाणे ठरत आहे. सध्याचे राजकारण अतिशय खालच्या दर्जाचे असून महिलांची पिळवणूक, अपशब्द, चिखलफेक केली जात आहे. आज महिला सर्व क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वावर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात उंच भरारी घेताना दिसतात तसेच राजकारणातही आज आपल्या देशातील सर्वोच्च राष्ट्रपती पदावर द्रौपदी मुर्मू विराजमान झालेल्या आहेत, तरीही काही कारणांनी देशातील स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. स्त्रियांचे स्थान हे समाजात महत्त्वाचे असून त्यांनी देशाच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. समानतेचे हक्क देऊन त्यांचा सन्मान राखणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सरकारतर्फे 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अशा योजना राबवून स्त्रियांचे शिक्षण वाढविण्याचा प्रयत्न आहे. देशात ग्रामीण क्षेत्रात व वेगवेगळ्या क्षेत्रात आदरयुक्त महिलांविषयी अतिशय चांगल्या घटना घडत असतात. खरे म्हणजे समाजामध्ये चांगल्या गोष्टींचा प्रभाव होण्याकरिता अशा बातम्या दाखविणे आवश्यक आहे. त्यातून इतर महिलांना प्रोत्साहन मिळू शकते. ऐवजी बलात्कार, विनयभंग, अपहरण अशा घटनांची ब्रेकिंग न्यूज चालविली जाते. प्रत्येकाने आपल्या घरातील स्त्रियांना प्रोत्साहन देऊन त्यांना योग्य शिक्षण द्यावे, सन्मानाने वागवावे. त्यांच्या हक्कांचे रक्षण करावे. समाजातील वाईट प्रवृत्ती दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. प्रत्येक व्यक्तीने महिलांकडे सन्मानाने पाहिले पाहिजे. आई, बहीण, मुलगी आणि बायको अशा विविध रूपात स्त्रिया लाभलेल्या आहेत. महिलांविषयी योग्य दृष्टिकोन ठेवल्यास खऱ्या अर्थाने महिलांचा आदर व आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला जाईल असे वाटते.

**केशव कुकडे** /९०११०६६ ७२६

### शिक्षणातील 'ग्रीन कॉरिडॉर'

महाराष्ट्रात दरवर्षी लाखो विद्यार्थी प्रवेश, परीक्षा आणि निकाल या तीन महत्त्वाच्या टप्प्यांमधून जातात. या प्रक्रियांवर त्यांच्या आयुष्याचा पुढील मार्ग अवलंबून असतो. मात्र, शिक्षण क्षेत्रातील अनेक प्रक्रिया आजही कागदी फाईली, प्रशासकीय स्तरांची गुंतागुंत आणि निर्णय प्रक्रियेतील विलंब यांच्या कचाट्यात अडकलेल्या आहेत. याचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो. शिक्षण व्यवस्थेला वेग देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे निर्णय तातडीने घेण्यासाठी 'ग्रीन कॉरिडोर इन एज्युकेशन' ही संकल्पना महत्त्वाची ठरते. वैद्यकीय क्षेत्रात ही संकल्पना जीवन वाचवण्यासाठी वापरली जाते. शिक्षण क्षेत्रातही परिस्थिती काही वेगळी नाही. येथेही विलंबाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या भविष्यावर होतो. शिक्षणातील निर्णय प्रक्रियेसाठीही अशाच प्रकारचा प्रशासनिक ग्रीन कॉरिडॉर तयार करण्याची गरज आहे. शिक्षणातील ग्रीन कॉरिडोर म्हणजे प्रवेश, परीक्षा आणि निकाल या प्रक्रियांमध्ये कोणताही अनावश्यक अडथळा न राहता निर्णय प्रक्रिया वेगाने पूर्ण होण्याची व्यवस्था. या व्यवस्थेत कोणतीही फाईल २४ तासांपेक्षा जास्त प्रलंबित राहणार नाही आणि विद्यार्थ्यांच्या हिताशी संबंधित निर्णय तातडीने घेतले जातील. याद्वारे परीक्षा संदर्भातील समस्या तातडीने सोडविण्यासाठी विशेष नियंत्रण कक्ष निर्माण करता येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देशांनी शिक्षण व्यवस्थेला वेग देण्यासाठी अत्यंत कार्यक्षम प्रणाली निर्माण केल्या आहेत. भारतामध्येही राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये शिक्षण व्यवस्थेला अधिक लवचीक, तंत्रज्ञानाधारित आणि विद्यार्थिकेंद्री बनवण्यावर भर देण्यात आला आहे. या धोरणात डिजिटल प्लॅटफॉर्म, पारदर्शक प्रशासन आणि वेगवान निर्णय प्रक्रियेवर विशेष भर आहे. 'ग्रीन कॉरिडोर इन एज्युकेशन' ही संकल्पना या राष्ट्रीय धोरणाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे. या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरावर यंत्रणा स्थापन करावी; ज्यामध्ये शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, विद्यापीठांचे कुलगुरू, तांत्रिक तज्ज्ञ आणि प्रशासनिक अधिकारी यांचा समावेश असावा. या प्रणालीमुळे शिक्षण व्यवस्थेत अनेक सकारात्मक बदल घडू शकतात. सर्वप्रथम विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रवासातील अनावश्यक अडथळे दूर होतील. प्रशासनातील पारदर्शकता वाढेल. निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान आणि प्रभावी बनेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांचा प्रशासनावरचा विश्वास दृढ होईल. ही व्यवस्था केवळ कागदावर राहू नये; ती प्रत्यक्षात परिणाम देणारी असावी. कारण शिक्षण क्षेत्रात होणारा प्रत्येक विलंब हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याच्या अमूल्य काळावर आघात असतो.

**प्रा. भागवत भांगे** /७२७६४६९८००


### सशक्तीकरणाची व्याख्या बदला



८ मार्चला जागतिक महिला दिन साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमांत महिला सशक्तीकरणावर अनेक चर्चा, उपक्रम राबविले जातात. पण वर्षांचे बाकी दिवस या महिला काय करतात, कसं आयुष्य जगतात हे पाहणे महत्त्वाचे आहे. महिला सशक्तीकरणाची सुरुवात अगदी मुळापासून म्हणजे आपल्या घरापासून झाली पाहिजे. घरच्या सुनांची उणीदुणी काढून, नावे ठेवून तिचा आत्मविश्वास कमी करण्याऐवजी तिच्यातील सुप्त गुण, तिची एखादी आवड जिला जोपासून ती आर्थिकरीत्या आत्मनिर्भर होऊ शकेल... ती ओळखून आपली सून अतिशय आत्मविश्वासाने समाजात उभी राहू शकेल, असा प्रयत्न करा. सुधा मूर्ती नेहमी त्यांच्या मुलाखतीत सांगतात की, त्यांना स्वयंपाक रुचकर बनवता येत नाही. मला सांगा खरंच आज त्यांनी जे यश, नावलौकिक मिळविला आहे, जे सामाजिक कार्य त्या करतात, त्यापुढे त्यांना स्वयंपाक चवदार येत नाही या गोष्टीला महत्त्व आहे का? आजकालच्या बहुतेक मुलींनी तर महिला सशक्तीकरण आणि महिला व्यक्तिस्वातंत्र्याची व्याख्याच बदलवून टाकली आहे. अर्धवट कपडे घालून खांदे, कंबर, पोट, मांड्या उघड्या ठेवून फिरणे, घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम आणि स्वतःला कमवायची अक्कल नसणे, कष्ट करण्याची ताकद नसणे, तरीही केवळ दिखावा करण्यासाठी महागड्या कॅफेमध्ये कॉफी पीत आपण काहीतरी खूप अफलातून आहोत असे हावभाव करणे... यांना वाटत झालं, स्त्री स्वातंत्र्य आणि सशक्तीकरण सिद्ध. डॉ. आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले आदी कितीतरी लोकांनी स्त्री विरोधी आणि स्त्रियांना घातक अशा कुप्रथांविरुद्ध लढा दिला, स्त्री शिक्षण आणि महिलांना समाजात मानसन्मान मिळावा म्हणून लढा दिला. पण आम्ही काय करतो आहोत? मिळालेल्या स्वातंत्र्याचा आणि संधींचा दुरुपयोग! स्वतःच्या सशक्तीकरणासाठी पुरुषांवर निर्भर राहण्यापेक्षा स्वतःच्या क्षमता ओळखा, दिखाव्याला बळी पडू नका, जितकं शिक्षण घेता येईल तितकं जास्त शिक्षण घ्या, वाचन करा, आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या घडामोडींविषयी माहिती घ्या, सामाजिक जागृतता ठेवा, आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न करा... मग महिला सशक्तीकरणाची व्याख्या तुमचा चेहराच सांगेल. एक शिक्षित स्त्री संपूर्ण घराला शिक्षित करते तसेच एक सशक्त स्त्री संपूर्ण घरातील आणि तिच्या आजूबाजूच्या महिलांना सशक्त करते. त्यामुळे जागतिक महिला दिनाच्या पर्वावर महिलांना सशक्तीकरणासाठी प्रोत्साहित करू या...

**प्रांजली र. भिवापूरकर** /९८५०४९६४५

### तरुणांचा ओढा योगाकडे...



तरुण वर्ग हा जिम, सायकलिंग, स्विमिंग, जॉगिंगसोबतच मोठ्या प्रमाणावर योगाकडे वळताना दिसून येत आहे. योगामुळे शारीरिक आरोग्य उत्तम राहतेच; मानसिक आरोग्यसुद्धा तंदुरुस्त राहण्यास मदत होते. प्रत्येक योगासनांचे फायदे आहेत जसे की, वज्रासन- उत्तम पचनक्रिया. भुजंगासन- मजबूत पाठीचा मणका. सूर्यनमस्कार- उच्च रक्तदाब कमी होतो. धनुरासन- पोटाची चरबी कमी होते. हलासन- थायरॉईड कमी होतो. उष्टासन- आतड्यांची क्षमता वाढते. प्राणायाम- तजेलदार त्वचा. त्यामुळे असंख्य तरुण वर्गांचा योगाकडे वाढता कल आहे.

**प्रा. सचिन जाधव** ८४२५००३१२७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## केज तालुक्यातील जानेगाव हनुमान मंदिरात जागतिक महिला दिन साजरा



तभा. वृत्तसेवा

**केज, प्रतिनिधी |** केज तालुक्यातील जानेगाव येथे ८ मार्च २०२६ रोजी हनुमान मंदिरात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला.

याविषयी सविस्तर वृत्त असे कि हा सुंदर असा कार्यक्रम येडेश्वरी फाउंडेशनच्या प्रमुख तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला तालुकाध्यक्ष शितलताई लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी माता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले गावातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

महिला दिनाचे अवचित्य साधून केक कापून घोषणा देण्यात आल्या मान्यवरांनी आपापले विचार मांडले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीक्षा चटप व शुभांगी कांबळे यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा शितलताई लांडगे यांनी महिलांना संबोधित केले की आजच्या युगात महिलांनी स्वतःच्या पायावर उभे राहून आपलं अस्तित्व तयार करावे, आपली नवीन ओळख निर्माण करावी स्वतः आर्थिक, सामाजिक,शारीरिक आणि शैक्षणिक रित्या सक्षम व्हावे महिला सक्षमीकरणासाठी येडेश्वरी फाउंडेशन आपल्या सदैव पाठीशी आहे असा शब्द आज जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने त्यांनी महिला भगिनींना दिला प्रमुख पाहुणे म्हणून सीआरपी सोनिया चटप मॅडम, उमेदच्या सीआरपी कांबळे मॅडम , राष्ट्रवादीच्या (sp) कार्यकर्त्या सिंधुताई पारवे, उमा मॅडम, मायाताई कसबे रागिनीताई वाघमारे व गावातील मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.

# बीडमध्ये 'महिला मॅरेथॉन' उत्साहात; जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाचा उपक्रम

## महिलांचा शंभर टक्के सहभाग ही बीडसाठी अभिमानाची बाब; जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन





तभा. वृत्तसेवा

**बीड, दि. ८ (प्रतिनिधी) |** जागतिक महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली 'महिला मॅरेथॉन' स्पर्धा रविवार दि.८ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेत शालेय विद्यार्थिनींपासून ते ज्येष्ठ महिलांपर्यंत सर्व वयोगटातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आरोग्यजागृती आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला.

महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जात पडताळणी विभागाचे सहाय्यक उपायुक्त उमेश सोनवणे तसेच तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महिला दिनानिमित्त मॅरेथॉनसारख्या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, विविध ठिकाणी आयोजित मॅरेथॉनमध्ये महिलांचा सहभाग तुलनेने कमी असतो, मात्र बीडमध्ये शंभर टक्के महिलांचा सहभाग दिसून येणे ही अभिमानाची बाब आहे. तसेच त्यांनी बीड जिल्ह्यातील बालविवाह आणि मुलींच्या शिक्षणातील गळतीच्या प्रश्नावरही प्रकाश टाकत समाजाने याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. अशा स्पर्धांमधून महिलांचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजात सकारात्मक संदेश पोहोचतो, असे त्यांनी नमूद केले.

सकाळी ६ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथून मॅरेथॉनला सुरुवात झाली. नगर रोड मार्गे पुन्हा सामाजिक न्याय भवन असा सुमारे ७ कि.मी. चा मार्ग स्पर्धकांनी उत्साहाने पार केला. १० ते १८ वर्षे आणि १८ वर्षांवरील अशा दोन गटांत ही स्पर्धा पार पडली. दोन्ही गटांत चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली.

स्पर्धेच्या शेवटी विजेत्या महिलांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यामध्ये गट-अ (१० ते १८ वर्षे) या गटात कु.दिव्या राठोड हिने २९ मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक पटकावला. तिला १५,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु.अमृता वायकर तर तृतीय क्रमांक कु.अक्षरा शेलार यांनी मिळवला. त्यांना अनुक्रमे १०,००० व ७,००० रुपये रोख पारितोषिकांसह सन्मानित करण्यात आले.

गट-ब (१८ वर्षांवरील) या गटात कु.परिमला बाबर हिने ३२ मिनिटांत शर्यत पूर्ण करत प्रथम क्रमांक मिळवला. तिला १५,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु.ज्ञानेश्वरी गुजर, तर तृतीय क्रमांक कु.कांचन शिंदे यांनी मिळवला. त्यांनाही अनुक्रमे १०,००० व ७,००० रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासन, योगा ग्रुप, बालाघाट ग्रुप, तसेच तुलसी शैक्षणिक समूहातील विविध युनिटचे प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल, प्रा.डी.डी.राऊत, प्रा. डी.जी निकाळजे, डॉ.सुनील जोंधळे, प्रा.प्रकाश ढोकणे, उमा जगतकर, डॉ.अश्विनी बेद्रे यांच्यासह शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. मॅरेथॉनला शहरातील नागरिक, पालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# परळी वैजनाथ नगरपरिषदेची थकीत कर वसुलीची धडक मोहीम सुरू

## परळी शहरातील नागरिकांनी विविध करांचा भरणा करून संभाव्य कारवाई टाळावी- मुख्याधिकारी श्री.पी.एन.निगळ

तभा. वृत्तसेवा

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) |** - परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या वतीने शहरामध्ये घरपट्टी, जमीन कर, इमारत किराया भाडे , पाणीपट्टी व दुकान शॉपिंग सेंटरची वसुली करण्यासाठी धडक मोहीम राबविण्यात येत आहे. ही धडक वसुली मोहीम नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्री. पी.एन.निगळ यांच्या मार्गदर्शनाखाली करवसुलीसाठी ६ पथके तयार केली आहेत. या पथकाच्या नेतृत्वाखाली तीव्र करण्यात आली असून, शहरातील इमारत भाडे थकवणाऱ्यांची गाळे सील करून कारवाई करण्यात आली आहे. परळी शहरातील नागरिकांनी वसुली मोहिमेस सहकार्य करून नागरिकांनी त्यांच्याकडील थकीत असलेली विविध करांचा भरणा करून संभाव्य कारवाई टाळावी असे आव्हान मुख्याधिकारी श्री. पी.एन. निगळ यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, आर्थिक वर्षातील शेवटचा मार्च महिना सुरू झाला तरी परळी वैजनाथ शहरातील काही मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर आणि पाणीपट्टी भरली नसल्यामुळे नगरपरिषद ॲक्शन मोडवर आली आहे. नगरपालिकेने करवसुलीसाठी ६ पथके तयार केली आहेत. त्याद्वारे घरोघरी जाऊन संबंधित मालमत्ताधरकांकडून करवसुली केली जात आहे. तसेच शहरातील मुख्य ११ ठिकाणी थकबाकीदारांची नावे असलेले बॅनर लावले जाणार आहेत. करभरणा करण्यासाठी दररोज घंटागाडीतून अनाउन्समेंट दिली जात आहे. शहरात वसुली मोहीम तीव्र करण्यात आली असून पुढील काही दिवसात थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करण्यात येणार आहे. सुट्टीच्या दिवशी सुध्दा वसुली लिपिकांकडे नागरिक कर भरू शकतात. तरी अनेक मालमत्ताधारक याकडे कानाडोळा करतात. त्यामुळे कर बुडवणाऱ्यांना



धडा शिकवण्यासाठी पथकांद्वारे थकबाकीदार असलेल्या मालमत्ता सील केल्या जात आहेत. परळी शहरातील थकबाकीदारांनी आपला करभरणा करून नगरपरिषदेला सहकार्य करावे अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल. परळी शहरातील नागरिकांना सोयी सुविधा देण्यासाठी नगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे लागणार आहे. नागरिकांच्या सहकार्यानेच हे काम पूर्ण होणार आहे. तरीशहरातील नागरिकांनी विविध करांचा भरणा करून संभाव्य कारवाई टाळावी मुख्याधिकारी श्री पी.एन.निगळ यांनी केले आहे.

## प्रा. रेश्मा म. निलंगेकर पिएचडी उत्तीर्ण

तभा. वृत्तसेवा

**बीड(प्रतिनिधी) |** प्रा. रेश्मा महेश निलंगेकर या सध्या पुणे येथील एस. पी.कॉलेज येथे हिंदी विषयाच्या सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी गेले तीन वर्षेत "राजस्थान के हिंदी लोक साहित्य में सामाजिक तथा सांस्कृतिक जीवन : एक अध्ययन"या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे प्रो. शशिकला राय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध सादर केला. डॉ.प्रा. रेश्मा म. निलंगेकर यांना पीएच. डी. म्हणजेच डॉक्टरेट पदवी (विद्यावाचस्पती) मिळाली आहे. डॉ. प्रा. रेश्मा निलंगेकर यांनी एम.ए.हिंदी , बी.एड, सेट या परीक्षा उत्कृष्ट गुणाने उत्तीर्ण असून, हिंदी राष्ट्रभाषा पुणे येथील हिंदी विषयात पंडित आहेत. हिंदी-मराठी भाषेच्या अनुवादक म्हणून कार्य करतात. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ मार्फत होणाऱ्या हिंदी भाषाविषयक उपक्रमात गेले १४ वर्षे जपानी मुलांना हिंदी शिकविण्याचे कार्य करत आहे. त्यांनी राजस्थानी सांस्कृतिक कार्यावर आधारित स्वर्णीम राजस्थान या हिंदी भाषेतील पुस्तकाच्या सहायक संपादक म्हणून कार्य केलेले आहे. त्यांना नुकतीच डॉक्टरेट पदवी मिळाली त्याबद्दल डॉ.प्रा.रेश्मा म. निलंगेकर यांचे सर्व क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



बीड : जिल्ह्यात गहु पीक काढनीला सुरूवात झाली आहे या यंत्रामुळे शेतकर्याला खूप मदत होत मजुरांच्या मागे लागण्याची गरज पडत नाही तालुक्यातील दहीहंडी गट नं. चारमधील छायाचित्र.

# गंगा माऊली शुगरचा हजार गाळपाचा टप्पा पूर्ण

तभा. वृत्तसेवा

**केज दि.८ (प्रतिनिधी) |** बीड जिल्ह्यात देखील चांगला साखर कारखाना निर्माण व्हावा व सर्वांना हक्काचा कारखाना वाटावा ही मनोमन असणारी शेतकऱ्यांची इच्छा व गरज लक्षात घेता बीड जिल्ह्याचे सुपुत्र लक्ष्मण मोरे यांनी मागच्या तीन वर्षांपूर्वी गंगा माऊली शुगर सुरू केला आणि शेतकऱ्यांना देखील आशेचा किरण पाहायला मिळाला व आज गंगा माऊली शुगर हा कारखाना शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र झाला असून या गळीत हंगामात ५ लाख ५० हजार ८८ गाळप करून



११ चा उत्कृष्ट साखर गाळप उतारा कारखान्याने स्थापीत केला याबद्दल सर्व ऊस उत्पादक शेतकरी, सभासद व कर्मचारी यांच्यामध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांचा हिताचा कारखाना म्हणून आता गंगा माऊली शुगर या कारखान्याने अल्पावधीत आपली ओळख निर्माण केली आहे केवळ साखरेचे गाळप करून इतर कारखान्याच्या बरोबरीने हा कारखाना उसाला भाव देत असून इतर कोणतेही उत्पादन नसल्याने केवळ आणि केवळ साखर उत्पादनावर हा भाव देणे तसे सोपे नाही मात्र लक्ष्मणराव मोरे यांनी सुरुवातीलाच सांगितले होते की या भागातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरच हसू हाच आमचा नफा असेल आणि अगदी त्याच प्रमाणे शेतकरी वर्ग या कारखान्याच्या बाबतीत आनंदी आहे.

हा कारखाना शेतकऱ्यांच्या विश्वासाला पात्र रहावा यासाठी लक्ष्मणराव मोरे हे प्रयत्न करत आहेत त्यांचेसोबत या कारखान्याच्या बाबतीत आदित्य पाटील, राहुल सोनवणे, हनुमंत काका मोरे, प्रविण मोरे, अविनाश मोरे यांचेही प्रयत्न मोठे मोलाचे असून यांचेसह कर्मचारी यांनी देखील कारखान्याचे गाळप मोठ्या ताकतीने सर्वांनी मिळून केले व आज रोजी ५ लाख ५० हजार ८८ गाळप करून गंगा माऊली शुगर हे गाळप बंद करत आहे.

### १५ दिवसाला बील देणारा एकमेव कारखाना

या कारखान्याने एक वैशिष्ट्य अगदी पहिल्या गळीत हंगामापासून जपले आहे ते म्हणजे दर १५ दिवसाला शेतकऱ्यांना उसाचे बील दिले आहे. आज देखील २८ फेब्रुवारी पर्यंतचे बील देऊन कारखान्याने शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला आहे.

# आई हे माफीचे मायालय आहे - ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे

## निर्भिडपणा, सत्यनिष्ठा जोपासणारी प्रा.गौतम गायकवाड यांची लेखणी - जेष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.धम्मपाल माशाळकर

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई |** येथील प्रवर्तनवादी चळवळीत सक्रिय असलेले प्रख्यात साहित्यिक प्रा.गौतम गायकवाड लिखीत निखाऱ्यातील अग्निफुले व माय या दोन ग्रंथांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

स्मृतिशेष सागराबाई केरबा गायकवाड यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त प्रा.गौतम गायकवाड लिखीत निखाऱ्यातील अग्निफुले व माय या दोन ग्रंथांचे प्रकाशन प्रा.डॉ.धम्मपाल रेवण माशाळकर (जेष्ठ साहित्यिक, सोलापूर) यांच्या हस्ते आणि सुप्रसिद्ध सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. या ग्रंथ प्रकाशन सोहळ्याचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक, भाषाप्रभू आणि गांधी भक्त तथा श्रध्देय बाबा आमटे यांचे मानसपुत्र प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांनी भूषविले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून गुरूवर्य विष्णू सगर गुरूजी (आष्टा कासार, ता.लोहारा.), प्रा.डॉ.दिलीप सावंत (साहित्यिक, नांदेड.), डॉ.बाबासाहेब ठोंबरे (सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य, कृषी महाविद्यालय, लातूर.), प्रा. डॉ.म.ना.गायकवाड (साहित्यिक, धाराशिव.), कमलाकर मोटे (मुख्याध्यापक, मुरूम.), पंडित कांबळे (साहित्यिक व कवी, धाराशिव.), तिलोत्तमा इंगोले पतकराव (आदर्श शिक्षिका, कवयित्री, अंबाजोगाई.) आणि लेखक प्रा.गौतम गायकवाड यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना जेष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.धम्मपाल रेवण माशाळकर यांनी सांगितले की, प्रा.गौतम गायकवाड हे उत्कृष्ट साहित्यिक असूनही दुर्लक्षित राहिले. त्यांनी वाचन - लेखन - पुस्तकांसाठी आयुष्य



दिले. निर्भिडपणा व सत्यनिष्ठा जोपासत प्रस्थापित व्यवस्थेवर परखड भाष्य केले आहे. असे प्रा.डॉ.माशाळकर म्हणाले. तर प्राचार्य डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी सांगितले की, प्रा. गौतम गायकवाड हे व्यक्ती म्हणून महत्त्वाचे आहेत. त्यांनी माय-माती-माणसं यांची नाळ तोडली नाही. ते हळव्या मनाचे आहेत. आई हे त्यांचे केंद्र आहे. आपल्या साहित्यातून त्यांनी आईला अजरामर केले आहे असे प्राचार्य डॉ.ठोंबरे म्हणाले. तर ज्येष्ठ साहित्यिक पंडित कांबळे यांनी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्मृतिशेष सागराबाई माय हे प्रा. गौतम गायकवाड यांचे आदर्श आहेत. तर प्रा.डॉ.दिलीप सावंत यांनी लेखक प्रा.गायकवाड यांच्याविषयीच्या अनेक आठवणी सांगितल्या. तिलोत्तमा पतकराव, गुरूवर्य सगर गुरूजी, सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे यांनी ही आपले समायोचित मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक करताना लेखक प्रा.गायकवाड यांनी कार्यक्रम आयोजन, ग्रंथ निर्मिती बाबतची पार्श्वभूमी सांगितली. विविध संदर्भ व दाखले देत त्यांच्या आयुष्यातील आईचे महत्त्व विशद केले. आई ही जगातील सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे. ज्यांना आई कळते, त्यांना जग कळते. आई हे माझं विश्व आहे. आई माझ्या जिव्हाळ्याचा विषय आहे. मी आज जो काही आहे तो आईमुळे व आदर्श गुरूजणांमुळे आहे असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांनी सांगितले की, प्रा.गौतम यांनी आंबेडकर घराण्यावर, गावावर आणि आईवर पुस्तके लिहून समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न केला आहे. आई हे जगातील न्यायालय नव्हे तर आपले सर्व गुन्हे माफ करणारे मायालय आहे. तिथे सर्व माफ होते. म्हणून देव ही आईच्या पोटी जन्म घेतो. आईत विश्व सामावलेले आहे. प्रा.गौतम गायकवाड यांच्या साहित्यात स्त्रीयांविषयीच्या जाणिवा, संवेदना, नातेबंध, भावना या संदर्भात अत्यंत हळुवारपणे नमूद केलेल्या दिसून येतात. प्रा.गायकवाड यांच्यासारखी माणसं दुर्मिळ होत चालली आहेत असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांनी काढले. प्रारंभी तथागत गौतम बुद्ध, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस तसेच स्मृतिशेष सागराबाई केरबा गायकवाड यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्त उपस्थित मान्यवर आणि गायकवाड परिवार, नातेवाईक यांच्याकडून पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बुद्ध-प्रबुद्ध पूजा, अभिवादनानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी लेखक प्रा.गौतम गायकवाड लिखित निखाऱ्यातील अग्निफुले व माय या दोन ग्रंथांचे विमोचन केले. यावेळी प्रा.गौतम गायकवाड यांनी आईच्या स्मृतीप्रीत्यर्थ गरजू महिलांना ३० साड्यांचे व उपस्थित वाचकांना ग्रंथ वाटप केले. तसेच आईविषयीच्या स्मृती म्हणून तिलोत्तमा पतकराव, सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे, राजमा शेख, आशाताई सुरवसे यांचा गायकवाड परिवाराकडून विशेष सन्मान करण्यात आला. तर लेखक प्रा.गायकवाड यांच्या गावचे सरपंच सुलतानपुरे गुरूजी, चंद्रकांत बनसोडे, सिद्राम तरकसे यांच्याकडून प्रा.गौतम गायकवाड यांचा हृदय सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम अत्यंत देखणा, भावनिक व वैचारिक पातळीवर उंचीचा ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बळीराम जोगदंड यांनी केले तर उपस्थितांचे आभार राहुल सुरवसे यांनी मानले. या कार्यक्रमास डॉ.ईडगार, प्रा.डॉ.साहेबराव गाठाळ, विश्वंभर वराट गुरूजी, विद्याधर पांडे, प्राचार्य डॉ.दिपक फुलारी, उपप्राचार्य बिभीषण फड, संतराम कराड, प्रा. नागनाथराव जल्दे आदींसह अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दिलीप गायकवाड, आर.जी. गायकवाड, जगन सरवदे, राजेंद्र घोडके, चंद्रकांत बनसोडे, सुभाष ताटे, आकाश वेडे, राजू वाघमारे आदींसह मित्र परिवार व गायकवाड कुटुंबियांच्या वतीने पुढाकार घेण्यात आला.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लोहाऱ्यात घरफोडी; १.४२ लाखांचा मुद्देमाल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.८ मार्च -**

तालुक्यातील धानुरी येथे अज्ञात चोरट्याने घरात शिरून रोख रक्कम व मोबाईल असा १ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आनंदराव शाहुराज सुर्यवंशी (वय ५७, रा. धानुरी, ता. लोहारा, जि. धाराशिव) यांच्या घराच्या गच्चीवरील दरवाजातून अज्ञात व्यक्तीने दि. ५ मार्च २०२६ रोजी पहाटे सुमारे २.४५ वाजण्याच्या सुमारास घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाटातून रोख रक्कम १,३५,००० रुपये व



पोको कंपनीचा मोबाईल असा एकूण १,४२,००० रुपयांचा ऐवज चोरून नेला.

या प्रकरणी आनंदराव सुर्यवंशी यांनी दि. ६ मार्च २०२६ रोजी दिलेल्या फिर्यादीवरून लोहारा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



## संक्षिप्त वृत्त...




### महिला दिनानिमित्त उमरग्यात कर्तृत्ववान महिलांचा गौरव

**उमरगा, दि.८ मार्च -**

येथील आयएसओ मानांकित व टोबॅको फ्री जिल्हा परिषद हायस्कूल, उमरगा येथे ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे होत्या, तर सुजाता मोरे प्रमुख उपस्थितीत होत्या. यावेळी मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते. कार्यक्रमात जि.प.प्रा. शाळा बालाजी नगरच्या मुख्याध्यापिका वंदना बिराजदार, सहशिक्षिका वैशाली चिट्टे, गंगुबाई लोखंडे, सोनाली मुसळे, भाग्यश्री पंडित, वर्षाराणी पाटील, तसेच सुमन साठे, कविता केदारे व सखुबाई चव्हाण या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. हा सत्कार शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शकुंतला मोरे व सुजाता मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग व संजय रूपाजी यांनी प्रयत्न केले.



### एकलव्य विद्या संकुलात महिलांचा गौरव

**तुळजापूर, दि.८ मार्च -**

एकलव्य विद्या संकुल यमगरवाडी येथे जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शाळेतील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला.महिलांनी शिक्षण क्षेत्रात दिलेल्या योगदानाबद्दल उपस्थितांनी त्यांचे कौतुक केले. याप्रसंगी सरस्वती जाधव, लता जाधव, सुनिता राठोड, लक्ष्मी पवार, विमल निंबाळकर, शशिकला भोजने, जयश्री, प्रणिता शेटकार, निर्मला हुग्गे, संगीता पाचंगे आणि सुमन सोमानी यांचा कार्यकर्ते गोविंद सोमानी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अनिल घुगे यांनी केले. या कार्यक्रमास गोविंद सोमानी, विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### परंडा येथे वेडे महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त रथोत्सव

**परंडा, दि.८ मार्च -**

परंडा शहरात सदगुरू यज्ञेश्वर शिवाचार्य (वेडे महाराज) यांच्या २२६ व्या पुण्यतिथीनिमित्त भव्य दिव्य रथोत्सव शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली. या धार्मिक सोहळ्यात परंडा शहरासह पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. परंपरेनुसार भोत्रा रोड येथील वेडे महाराज मठात बुधवारपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी (दि.७) पुण्यतिथीनिमित्त सकाळी सिधलिंग राजदेशीकेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली रथोत्सव वाजतगाजत काढण्यात आला. यानंतर वेडे महाराज मठ येथे धर्मसभेचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यास वेदांताचार्य मुक्तेश्वर शिवाचार्य महाराज (वेळापूर), सिद्धलिंग राजगुरू शिवाचार्य महाराज (शिंगणापूर), डॉ. निळकंठ शिवाचार्य महाराज (धारेश्वर), शिवानंद शिवाचार्य महाराज (वाळवा), वेदांताचार्य महाराज (वसमत), प्रभुदेवा शिवाचार्य महाराज (माढा), विरूपाक्ष शिवाचार्य महाराज (मानूर) आदी मान्यवर उपस्थित होते.



### लोटस पोदार लर्नमध्ये महिला दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

**उमरगा, दि.८ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा येथे महिला पालकांसाठी विविध खेळ व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेच्या विश्वस्त संजीवनी अरगडे व सुषमा कोकरे तसेच परीक्षक डॉ. अमृता इनामदार, कविता माने आणि प्रणिता पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमात महिलांसाठी संगीत खुर्ची, रिंग-बॅलून, बुक बॅलन्स, उखाणे आणि रॅम्प वॉक अशा विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. महिला पालकांनी उत्साहाने सहभाग नोंदवत कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंजिरी सूर्यवंशी, संगीता अरिकर आणि रोहिणी डांगे यांनी समन्वयक म्हणून पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी केले.

## पर्यटन विद्यापीठामुळे शहराला नवी ओळख : आ. राणाजगजितसिंह पाटील

### नळदुर्गमध्ये ६ कोटींच्या ४१ विकासकामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ मार्च -**

नळदुर्ग येथे उभारण्यात येणाऱ्या पर्यटन विद्यापीठामुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळणार असून शहराच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. त्यामुळे नळदुर्ग पर्यटन क्षेत्रात नावारूपास येईल, असे मत आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केले.



नळदुर्ग नगरपालिकेच्या वतीने अंबाबाई मंदिर परिसरात नगरपालिकेच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सुमारे ६ कोटी रुपये खर्चाच्या ४१ विकासकामांचा शुभारंभ आमदार पाटील यांच्या हस्ते झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष बसवराज धरणे होते. यावेळी युवा नेते सुनिल चव्हाण, प्रदेश कार्यकारिणी सदस्य नितीन काळे, उपनगराध्यक्ष नय्यर जहागीरदार, नगरसेवक दत्तात्रय दासकार, बांधकाम सभापती शशिकांत पुदाले यांच्यासह अनेक नगरसेवक उपस्थित होते.

आ. पाटील म्हणाले की, शहरात होणारी सर्व विकासकामे दर्जेदार असावीत. निकृष्ट काम झाल्यास त्याचे पैसे मिळणार नाहीत. विकासकामांवर नगरसेवकांसह नागरिकांनीही लक्ष ठेवावे. नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यामुळे पर्यटन विकासाची मोठी संधी असून किल्ला परिसरात टुरिझम विद्यापीठ उभारण्याची संकल्पना राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अंबाबाई देवस्थान ट्रस्टतर्फे आमदार पाटील व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## श्री तुळजाभवानी मंदिरात रंगपंचमी साजरी; देवीला सप्तरंगांची उधळण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**

श्री तुळजाभवानी मंदिरात रंगपंचमीचा उत्सव आज अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंदिरात देवीची विशेष पूजा, अभिषेक आणि रंगउधळण करून रंगपंचमी साजरी करण्यात आली.



सकाळी लवकर देवीचा विधीवत अभिषेक व पूजा करण्यात आली. त्यानंतर देवीला पांढराशुभ्र शालू नेसविण्यात आला. या पांढऱ्या शालूवर सप्तरंगांची उधळण करून रंगपंचमीचा मुख्य सोहळा पार पडला. मंदिरातील महंत आणि पुजाऱ्यांनी पारंपरिक पद्धतीने देवीला रंग अर्पण करून उत्सवाची सुरुवात केली.

रंगपंचमीच्या दिवशी देवीला रंग अर्पण करण्याची जुनी परंपरा आहे. या दिवशी देवीला विविध रंग अर्पण करून भक्त तिच्या चरणी प्रार्थना करतात. देवीला रंग अर्पण केल्यानंतर मंदिरातील पुजारी, सेवेकरी आणि भाविक एकमेकांना रंग लावून आनंद व्यक्त करतात. या उत्सवात प्रामुख्याने नैसर्गिक रंगांचा वापर करण्यात येतो. या उत्सवानिमित्त मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. अनेक भाविकांनी देवीचे दर्शन घेऊन रंगपंचमीचा आनंद लुटला. मंदिर प्रशासनाने भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक व्यवस्था केली होती.

यावेळी महंत वाकोजी बुवा, महंत हमरोजी बुवा, सहायक व्यवस्थापक, पुजारी बांधव तसेच मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. रंगपंचमीच्या या पारंपरिक उत्सवामुळे मंदिर परिसरात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते. अनेक भाविकांनी देवीच्या चरणी रंग अर्पण करून सुख-समृद्धीची प्रार्थना केली.

## धाराशिवात महिला गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

शहरातील भीमनगर परिसरात एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावून नेल्याची घटना घडली असून याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अलका हर्ष बनसोडे (वय ४८, रा. भीमनगर,



धाराशिव) या दि.६ मार्च रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास धाराशिव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ फिरत होत्या. यावेळी पाठीमागून मोटरसायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण (किंमत अंदाजे ७० हजार रुपये) हिसकावून घेतले व घटनास्थळावरून पळ काढला.

या घटनेबाबत अलका बनसोडे यांनी दि.७ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

### कळंब तालुक्यातील शिराढोण येथील घटना...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ मार्च -**

शिराढोण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची गंभीर घटना समोर आली असून या प्रकरणी संबंधित तरुणाविरुद्ध पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एका गावातील १७ वर्षीय मुलगी (नाव व गाव गोपनीय) हिला दि. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री १० वाजल्यापासून ते २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजेपर्यंत एका गावातील तरुणाने लॉजवर नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तसेच तिला शिवीगाळ करून मारहाण केली व पीडितेच्या आई-वडिलांना जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पीडित मुलीने दि.६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून शिराढोण पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## निवडीनंतर दुसऱ्याच दिवशी कामाला सुरुवात

### सभापती आकांक्षा चौगुले यांची उपोषणस्थळी भेट...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.८ मार्च -**

उमरगा पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांनी निवडीनंतर दुसऱ्याच दिवशी आपल्या कामकाजाला सुरुवात करत काळेवाडी येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाची दखल घेत उपोषणस्थळी भेट दिली.



भगतवाडी, कोळेवाडी व चिरेवाडी या ग्रुप ग्रामपंचायतीअंतर्गत विविध विषयांवरून ग्रामस्थांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या. या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी बलभीम इरले व बालाजी करणुरे हे ग्रामस्थ मागील दहा दिवसांपासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले होते. शनिवार (दि.७) रोजी सभापती ॲड. आकांक्षा चौगुले यांनी काळेवाडी येथे उपोषणस्थळी भेट देऊन ग्रामस्थांच्या मागण्या जाणून घेतल्या. तसेच संबंधित मागण्यांची चौकशी करून आठवड्याच्या आत अहवाल सादर करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. यावेळी त्यांनी उपअभियंता दिलीप बिराजदार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून या विषयावर चर्चा केली.

सभापती यांच्या आश्वासनानंतर उपोषणकर्त्यांनी नारळ पाणी घेऊन आपले उपोषण स्थगित केले. यावेळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी भांगे, अत्तार, नगरसेवक पंढरीनाथ कोणे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## मसला खुर्द येथे निकृष्ट प्लेवरब्लॉक कामाचा आरोप

### चौकशी न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील मसला खुर्द येथे दलित वस्ती निधी योजनेतून करण्यात आलेले प्लेवरब्लॉकचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या कामाची तात्काळ चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर कारवाई करावी, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

याबाबत ग्रामस्थांनी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, अनुसूचित जाती



व नवबौद्ध घटक विकास योजनेंतर्गत मसला खुर्द येथे करण्यात आलेले प्लेवरब्लॉकचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

या कामाबाबत १२ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता, तुळजापूर बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता तसेच ग्रामपंचायत कार्यालयाला लेखी तक्रार देण्यात आली होती. मात्र ११ महिने उलटूनही कोणतीही चौकशी करण्यात आली नाही.

उलट कामाची पाहणी न करता सरपंच, ग्रामसेवक व संबंधित अभियंता यांच्या सहमतीने कामाचे बिल अदा करण्यात आल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित कंत्राटदाराचे लायसन्स रद्द करून कायदेशीर कारवाई करावी व पुढील कामे देऊ नयेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर हनुमान शिंदे, आकाश वडवराव, राजेंद्र वडवराव, सुनील शिंदे, विकास शेंडगे, अंकुश शिंदे, नागनाथ शिंदे, यशवंत डोलारे, धनाजी डोलारे, राजेंद्र शेंडगे, धनाजी येडाळे यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## धाराशिव शहरात स्वस्त सोन्याच्या आमिषाने ३.५० लाखांची फसवणूक

### शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ मार्च -**

स्वस्त दरात सोन्याची माळ देण्याचे आमिष दाखवून एका तरुणीची ३ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना शहरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी दोन अज्ञात इसमांविरुद्ध धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्नेहल दत्ता नन्नवरे (वय २२, रा. कुरणे नगर, धाराशिव, मूळ रा. भातंब्रे ता. बार्शी, जि. सोलापूर) या दि.१० डिसेंबर २०२५ रोजी धाराशिव येथील छत्रपती संभाजी महाराज चौकातील रिटेल-होलसेल दुकानाजवळ होत्या.

यावेळी दोन अनोळखी इसमांनी त्यांचा विश्वास संपादन करून कमी किंमतीत सोन्याची माळ विकण्याचे आमिष दाखवले. फिर्यादी यांनी ती माळ खरेदी केल्यानंतर ती सोन्याची नसून पितळ सदृश्य धातूची असल्याचे त्यांच्या लक्षात आले. अशा प्रकारे आरोपींनी फिर्यादींची ३,५०,००० रुपयांची फसवणूक केली.

स्नेहल नन्नवरे यांनी दि.६ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## परंडा न्यायालयात शनिवारी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ मार्च -**

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परंडा न्यायालयात शनिवार, दि..१४ मार्च रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोक अदालतीत विविध प्रकरणे तडजोडीच्या माध्यमातून निकाली काढण्यात येणार आहेत.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये दिवाणी दावे, तडजोडीस पात्र फौजदारी प्रकरणे, पोटगी प्रकरणे तसेच दावा दाखलपूर्व प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याची संधी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा न्यायाधीश डॉ.एफ.ए.एम. ख्वाजा यांनी केले आहे.

## तेरखेड्यात लहानग्यांचा रंगपंचमीचा जल्लोष



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात रंगपंचमीचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. गावोगावी नागरिकांनी एकमेकांना रंग लावून सणाचा आनंद लुटला.

तालुक्यातील तेरखेडा येथे मात्र लहान मुलांचा उत्साह विशेष पाहायला मिळाला.

रविवारची शाळेला सुट्टी असल्याने सकाळी नऊ वाजल्यापासूनच मुलांनी ग्रुप तयार करून गावातील गल्लोगल्ली फिरत रंगपंचमी साजरी केली.

बॉटल पिचकारी, रंगांनी भरलेल्या बाटल्या आणि विविध रंग हातात घेऊन मुलांनी एकमेकांवर रंगांची उधळण केली. लहान मुलांच्या या आनंदी जल्लोषामुळे संपूर्ण गावात सणाचा उत्साह पसरला होता.

## ‘सावित्रीच्या कविता’ संग्रहाला साहित्य पुरस्कार

**धाराशिव, दि.८ मार्च -**

एकता फाउंडेशनतर्फे दिला जाणारा सन २०२५ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट संशोधन-संपादन साहित्य पुरस्कार येथील डॉ. रेखा ढगे यांनी संपादित केलेल्या ‘सावित्रीच्या कविता’ या साहित्यकृतीला जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार कै. परमेश्वर कैतके यांच्या स्मरणार्थ दिला जातो. ‘सावित्रीच्या कविता’ या काव्यसंग्रहाचे संपादन डॉ. रेखा ढगे यांनी केले असून कविता रमेश पुदाले यांनी सहसंपादक म्हणून काम पाहिले आहे.

# अन् सुट्टीच्या दिवशी प्रकटले मुख्याधिकारी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ८ मार्च-**

नगर परिषदेचे मुख्याधिकारी गेल्या अनेक दिवसांपासून कार्यालयात सतत गैरहजर राहत असल्याने शहरातील विकासकामे पूर्णपणे ठप्प झाली असल्याचे वृत्त दै. तरुण भारतमध्ये प्रकाशित करण्यात आले होते. वृत्त प्रकाशित होताच मुख्याधिकारी सुट्टीच्या दिवशीही कार्यालयात अवतरले. अन थेट वसुलीची धडक मोहीम राबविली. दरम्यान ही मोहीम कामाचा भाग होती की दिखावा याबाबतही शहरात चर्चा सुरु आहे.



मुदखेड नगर परीषदेचे मुख्याधिकारी सतत गैरहजर असल्याने नागरिकांची कामे खोळंबली आहेत. मागील दोन आठवड्यात दि.२५ फेब्रूवारी रोजी नगर परिषदेत जीबीच्या बैठकीला मुख्याधिकारी यांची उपस्थिती होती. त्यानंतर त्यांच्या कक्षाला सतत कुलूपच दिसुन येत होते. परीणामी नागरीकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष तर मुख्याधिकारी नसल्याने नगर परिषदेच्या इतर कर्मचाऱ्यांवर वचक राहिला नाही, कामचुकारपणा वाढला आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी नागरिकांना रोज फेऱ्या माराव्या लागत आहेत, त्यामुळे नागरीकांमध्ये असंतोष वाढत असल्याने मुख्यधीऱ्यांचा कक्ष कुलुपबंद या मथळ्याखाली तरुण भारतमध्ये वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. वृत्त प्रकाशित होताच मुख्याधिकाऱ्यांनी सुट्टीच्या दिवशी नगर परिषद कार्यालयात येऊन कर्मचाऱ्यांसोबत वसुली केली. विशेष म्हणजे वसुली मोहीमेची माहिती तातडीने पत्रकारांना दिली. या वसुली मोहिमेचे वृत्त देखील काही वर्तमानपत्रात प्रकाशित झाले आहे. त्यामुळे ही वसुली मोहीम कुलुपबंद कक्षावर पडदा टाकण्यासाठी होती की काय अशी चर्चा शहरात सुरु आहे.



तरुण भारत इफेक्ट

# सगरोळी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीर अभियानास प्रतिसाद

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ८ मार्च-**

शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली बिलोली तालुक्यातील सगरोळी येथे संस्कृती संवर्धन मंडळ के. व्हीं. के. येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष बिलोलीचे तहसिलदार गजानन शिंदे हे होते. तर यामध्ये विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरामध्ये ग्रामविकास, आरोग्य, कृषी, भूमिअभिलेख (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारले. तहसील कार्यालय,



बिलोली यांच्यावतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले. यामध्ये ७६ ऑनलाईन डिजिटल सातबारा उतारे व ७६ आठ-अ उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच १८ पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला.

याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले. शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८-अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून विविध दाखले एकूण ४७ वाटप करण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व प्राथमिक आरोग्य केंद्र, विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या. या कार्यक्रमास सुनील देशमुख तसेच सामाजिक अर्थसहाय योजनेचे अनिल परळीकर, विवेक गुडप ता कृषी अधीकरी, श्रीकांत जाधव साहेब सामाजिक वनीकरन देगलूर, देशमुख बाळासाहेब उपअद्यक्षिक भूमिअभिलेख, उमकांत पंतुलावार दुय्यमनिबंक, यांनी मार्गदर्शन केले. तर यावेळी नायब तहसीलदार आ. जि. चव्हान साहेब नायब तहसिलदार, दीपक मराळे नायब तहसिलदार, गणपत वाडेकर ता आरोग्य अधिकारी, व्यंकट पा. शिंदे, ननू कानगुले आदमपुरचे मंडळ अधिकरी उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल धुळगंडे मंडळ अधिकरी यांनी केले, तर चंद्रकांत जाधव तलाठी यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# मुक्रमाबाद ग्राम पंचायत वार्ड रचना जाहीर;७ ते१३ एप्रिल पर्यंत घेण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**मुक्रमाबाद, दि. ८ मार्च-**

मुखेड तालुक्यातील सर्वात मोठी ग्राम पंचायत असलेल्या मुक्रमाबाद ग्राम पंचायतची वार्ड रचना रविवार (ता.आठ) सकाळी दहा वाजता ग्राम पंचायत सभागृहात वार्ड रचनेची प्रक्रिया पार पडली.

वार्ड रचनेचे



कार्यक्रमधिकारी म्हणून ग्राम महसूल अधिकारी. के.एम. कोडलवाड, यांची उपस्थिती होती. २०११ जनगणनेसुसार मुक्रमाबाद शहराची लोकसंख्या आठ हजार २९९ एवढी असून एकूण सहा वार्ड असून १७ सदस्य संख्या एवढी असून एका उमेदवाराला ४८८ एवढी लोकसंख्या येत असून वार्ड रचना ही रोटेशन (परिभ्रमण ) पध्दतीने करण्यात आली.असून आक्षेप तारीख दि ७ ते १३ एप्रिल पर्यंत घेण्याचे आव्हान ग्राम महसूल अधिकारी. के.एम. कोडलवाड, यांनी केले. यावेळी सुभाषअप्पा बोधने, सुरेशदादा पंदिलवार, उप सरपंच सदाशिव बोयवार, ग्राम पंचायत सदस्य शंकरअप्पा खंकरे, बालाजी पसरगे,दादाराव गुमडे, गौसखां पठाण, रज्जाक कुरेशी, बाबूराव गंदिगुडे, शशिकांत तेंलंग, सुर्यकांत भंगे , अवि पंदिलवार, अब्दुल पटेल. अशोक लोणीकर यांच्यासह शहरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## गोठ्यात हातभट्टी दारू काढणाऱ्यावर पोलिसांची धाड; साहित्य नष्ट,

**माहूर**-माहूर तालुक्यातील अती दुर्गम,डोंगराळ पायथ्याशी असलेल्या मौजे हिंगणी येथे घराला लागून असलेल्या गोठ्यात हातभट्टी दारू काढण्याचा प्रयत्नात असलेल्या नागरिकास पोलीस निरीक्षक देविदास



चोपडे यांनी स्वतः रंगेहात पकडून मोहफुलाचे बनविलेले रसायन आणि ईतर घातक केमिकल नष्ट करण्यात आल्याची घटना दि. ०८ मार्च रोजी सकाळी १० वा.च्या सुमारास घडली आहे. पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या ऑपरेशन फ्लॅश आऊट तसेच पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांच्या अवैध दारू विक्री विरोधात सुरू असलेल्या मोहिमे अंतर्गत पोलीस निरीक्षक देविदास चोपडे हे क्शन मोडवर असून, माहिती मिळताच त्यांनी धडक कारवाया सुरू केल्या आहेत. गेल्या आठवड्यात तीन ठिकाणी धाडी टाकून हजारो रुपयांचा मुद्देमाल नष्ट करून अनेकांवर गुन्हे दाखल केलेले आहेत. मौजे हिंगणी येथे घराला लागून असलेल्या गोठ्यात एक इसम हातभट्टीची दारू काढण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी सोबत पोहेका प्रशांत भोपळे, पोका पवन राऊत, होमगार्ड उमेश भगत, खुशवंत वर्मा यांचे सह पोलिसांनी गोठ्यात धाड टाकत अवैध दारु बनविण्याचे साहित्य नष्ट करून हातभट्टीची दारू काढणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.अवैध दारू विक्री आणि हातभट्टी दारू काढणाऱ्या नागरिकाचे गावकऱ्यांनी समुपदेशन करावे न ऐकल्यास दारू विक्रेत्याविरुद्ध पोलिसात तात्काळ खबर देण्याचे आवाहन यावेळी पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी उपस्थित गावकऱ्यांना केले.

# बाऱ्हाळी येथे छ.शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ८ मार्च-**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक एक ची अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय च्या अनुषंगाने बा-हाळी ता. मुखेड येथे वै.भाऊसाहेब देशपांडे मंगल कार्यालयात शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये अनुप पाटील (उपविभागीय अधिकारी देगलूर) राजेश जाधव (तहसीलदार मूखेड),राजन देशपांडे, शेखर देशमुख,व्यंकट वळगे हनमंतमामा,वाडीकर, व्यंकट पा.उमाटे,यांच्या उपस्थितीत शिबिरात पूरवठा विभाग, आरोग्य, क्रषी,भूमिअभिलेख, महसूल विभागाच्या वतीने ७/१२अभिलेखा मधे सूधारणा करून वाटप करण्यात आले,विद्यार्थ्यांना विविध प्रमाणपत्रे अर्ज स्विकारुन वाटप करण्यात आले, नागरिकांना कलम ४२ अ,४२ब,४२क,४२ड अन्वये सनद देण्याची



प्रक्रिया आले बाबद माहिती देण्यात आली.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी अनूप पाटील यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते योजना याबाबत सखोल मार्गदर्शन केले तसेच मुंबई जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांची एकत्रीकरण करण्याबाबत सुधारणा विषयी नागरिकांना मार्गदर्शन केले. तहसीलदार राजेश जाधव यांनी अकर्षिक परवानगी रद्द करण्यात आलेल्या अध्यायावत सुधारणा याबाबत नागरिकांना सखोल मार्गदर्शन करून एक वेळ अधिमुल्य भरण्यास नवीन व्यवस्था याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

या प्रसंगी ऐक खिडकी योजनेअंतर्गत अँग्रीस्टँक,ई मोजणी, पि.ऐम.किसान व नागरीकांच्या तक्रारीचे निवारण करण्यात आले. या शिबिरात विविध विभागाचे अधिकारी ,कर्मचारी, मंडळी अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील ,अंगणवाडी सेविका ,महसूल सेवक यांच्या सह विद्यार्थी, शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृष्णदेवाच्या काठीचा विधिवत समारोप; चार गावातून सुरुवात, तिस गावात मुक्काम.

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. ८ मार्च-**

ग्रामीण भागात कृष्णदेवाची म्हणून काठी म्हणून पारंपरिक ओळख असलेल्या धार्मिक सोहळ्याचा फाल्गुन महिन्यातील दशमीला दहाव्या दिवशी चार गावांमध्ये विधिवत समारोप झाला.

वायफना बुद्रुक,पिंपराळा, पांगरी, तळेगाव या गावातील कृष्ण मंदिरात फाल्गुन एकादशीला काठीचे पूजन करून गावातून प्रस्थान झाले होते. अंदाजे १५ फूट लांब काठीला विविध वस्त्र बांधून सजवून काठीचे मानकरी व सहभागी भाविक दहा दिवस अनवाणी राहून अंदाजे आठ ते दहा गावात मुक्कामी जातात. मुक्कामी असलेल्या गावात काठीचे पारंपरिक पद्धतीने स्वागत होते. काठी वाहून नेताना पारंपारिक डफ व पुंगी वाद्याचा गजर वातावरण खुलविते. दहा दिवसात अंदाजे ८० किलोमीटर पायी प्रवास होतो. दशमीला मूळ गावी काठीची आगमन होऊन पंचक्रोशीतील



हजारो ग्रामस्थांच्या उपस्थितीत लग्न सोहळा रंगतो. यावेळी कृष्ण मंदिराभोवती काठीला पाच प्रदक्षिणा घालून मंगलाष्टकाद्वारे लग्न सोहळा रंगतो. पारंपरिकता ग्रामीण भागातील पारंपारिकता जपणारा हा काठीचे लग्न सोहळा सोहळ्यामध्ये कुठलाही वाद्य वाजविले जात नाही. वायफना बुद्रुक, पिंपराळा, तळेगाव, पांगरी येथील काठीचे लग्न सोहळ्यात पारंपारिकता व ग्रामीण संस्कृतीचे दर्शन बघायला मिळाल्याचा आनंद अनुभवायला येतो. हदगाव तालुक्यातील वायफना बुद्रुक येथील कृष्ण मंदिर परिसर काठीचे लग्न निमित्त भाविकांनी गजबजला होता.

## सरपंच संध्याताई हंबर्डे यांच्या वतीने महिला शिक्षिकांचा सत्कार

**नवीन नांदेड** - विष्णुपुरी ग्रामपंचायतीच्या प्रशासक तथा माजी सरपंच सौ.संध्याताई विलासराव हंबर्डे व माजी ऊपसरपंच सौ. अर्चना विश्वनाथ हंबर्डे यांच्या वतीने पिएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथील कार्यरत असलेल्या महिला शिक्षिका व ग्रामपंचायतच्या सर्व



महिला सदस्य यांचा व किशोरवयीन मुलींस समुपदेशन स्त्रीरोग तज्ञ डॉ.अंबिका माटोरे यांनी दिले तदनंतर त्यांचे सत्कार करण्यात आले . जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने दिनांक ७ मार्च रोजी घेण्यात आलेल्या सत्कार समारंभ कार्यक्रमात पिएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे ग्रामपंचायत कार्यालय विष्णुपुरी येथील प्रशासक तथा माजी सरपंच सौ.संध्याताई विलास देशमुख व माजी ऊपसरपंच सौ.अर्चना विश्वनाथ हंबर्डे, यांनी जिल्हा परिषद हायस्कूल मधील किशोरवयीन मुलींचे समुपदेशन बाबत मार्गदर्शन स्त्री रोग तज्ञ डॉ.अंबिका माटोरे यांनी केले्. यावेळी शाळेतील शिक्षीका व शिक्षकेतर महिला कर्मचारी यांच्या सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ.उज्ज्वला जाधव तर सुत्रसंचलन अपर्णा देशमुख यांनी केले.यावेळी शकुंतला चौदंते, सविता चेरलेवार, मीरा रेवणवार,अनिषा बेगम,उषा गुंटूरकर ,निता धुमाळ ,सपना कदंमवार, स्मिता ऊदवंत,अल्पना हाते, अंजली भंडे,चारूलता येवतीकर, सुनिता सोळुंके,पंचफुला नाईनवाड, अपर्णा देशमुख,अनुजा पवार,शैलेजा बुरसे,विद्या लोणे, वैष्णवी शिंदे,पगडे मॅडम,नंदा गोटमवाड, आशा कोकाटे यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थीनीची उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा देशमुख यांनी केले.

# रणजीत वर्मा यांचे जहांगीर आर्ट गॅलरीत 'ग्वाला' चित्र प्रदर्शन !

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ८ मार्च-**

चित्रकार आपल्या कलेतून भावनांना रंग आणि रूप देतो. त्यामुळे चित्रकाराची कला म्हणजे 'रंगांच्या माध्यमातून मानवी भावनांना दिलेले दृश्य रूप' समजण्यात येते.कला केवळ सुशोभीकरणासाठी नसून,सांस्कृतिक, सामाजिक किंवा वैचारिक संदेश देण्याचे कार्य करते. आणि हे कार्य आपल्या वैविध्यपूर्ण कलाकृतीतून दर्शविणारे माहूर येथील सुप्रसिद्ध चित्रकार रणजित दत्त वर्मा हे अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय स्तरावर आयोजित चित्र प्रदर्शनातून रसिक प्रेक्षकांना सादर करत आलेले असून, आता रणजीत वर्मा यांचे जगप्रसिद्ध जहांगीर कला दालन,मुंबई येथे येत्या दि. १६ मार्च ते २२ मार्च २०२६ दरम्यान ग्वाला शिर्षकांतर्गत चित्र प्रदर्शन होत असून, त्याचे उद्घाटन १६ रोजी सायंकाळी पाच वाजता महाराष्ट्र राज्याचे आय. टी. तथा सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमास किनवट/माहूरचे आमदार भीमराव केराम तथा बडनेराचे आमदार रवी राणा तसेच अजोयकांत रुईया चेअरमन,ऑल स्टेट ग्रुप,सर जे.जे. स्कुल ऑफ आर्ट आर्कीटेक्चर अँड डिझाईन मुंबईचे माजी विभाग प्रमुख डॉ.गणेश तरतरे,जे. के. अक्ॅडमी,आर्ट अँड डिझाईन मुंबईचे प्राचार्य सुरेंद्र जगताप, जे.के.अक्ॅडमी ड्रॉईंग अँड पेंटींगचे विभाग



प्रमुख तथा किनवट / माहूर विधानसभा क्षेत्रातील मूळ निवासी प्रसिद्ध चित्रकार बालाजी उबाळे यांची प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थिती लाभणार आहे.

चित्रकाराची कला (चित्रकला) ही रंग, रेषा, आकार आणि पोत यांचा वापर करून द्विमितीय पृष्ठभागावर (कॅनव्हास, कागद, भिंत) आपली कल्पनाशक्ती,भावना आणि विचार दृश्य स्वरूपात अनुभव व्यक्त करण्याची एक सशक्त कलात्मक अभिव्यक्ती आहे. ती केवळ देखावा टिपत नाही, तर ब्रश किंवा इतर साधनांद्वारे मानवी सर्जनशीलता आणि संवेदना चित्रात मांडते. चित्रकार स्वतःच्या भावना, अनुभव किंवा जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन चित्राद्वारे मांडतो. तयार होणाऱ्या चित्राला कलाकृती म्हणतात,जी प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करते.कलाकार आपल्या मनातील विचार, भावना, दृश्ये किंवा एखादी कथा रंगांच्या माध्यमातून मांडतो.

ही एक दृश्य कला आहे, जी प्रेक्षकांना अनुभवता येते आणि समजता येते. ही कला केवळ सुशोभीकरणासाठी नसून, सांस्कृतिक, सामाजिक किंवा वैचारिक संदेश देण्याचे काम करते.

प्रत्येक चित्रकाराची स्वतःची अनोखी शैली असते, जी त्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी किंवा कल्पनाशक्ती दर्शवते. कलाकाराचे सर्जनशील कौशल्य आणि कल्पनाशक्ती हे चित्रकलेचा गाभा आहे,

आणि हे कार्य माहूर चे चित्रकार रणजित वर्मा आपल्या अनोख्या शैलीतून वेळोवेळी व्यक्त करत आलेले आहेत.

मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरी हे भारतातील कलाकारांसाठी प्रतिष्ठेचे केंद्र असून, येथे एम.एफ. हुसेन, एस.एच. रझा यांसारख्या दिग्गज कलाकारांसह अनेक समकालीन चित्रकारांनी आपली चित्रे प्रदर्शित केली आहेत. हे कलादालन आधुनिक आणि समकालीन भारतीय कलेचे प्रमुख प्रदर्शन केंद्र मानले जाते.हे कलादालन भारतातील चित्रकारांसाठी एक पंढरी मानले जाते, जिथे नवोदित आणि प्रस्थापित कलाकारांना संधी मिळते.येथे दर आठवड्याला नवीन कलाप्रदर्शने आयोजित केली जातात.याव्यतिरिक्त, दरवर्षी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलाकार आपली कलाकृती इथे प्रदर्शित करतात. अशा या जगप्रसिद्ध ठिकाणी चित्रकार रणजित वर्मा यांच्या चित्रांचे प्रदर्शन होणार असल्याने माहूरच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानाचा तुरा खोवला जाणार आहे.

ग्वाला' या शिर्षकांर्तगत ग्रामीण भागातील प्रसिद्ध चित्रकार रणजीत दत्त वर्मा यांनी चित्र मालिका तयार केली असून ती ग्वाला या व्यक्तिरेखे भोवती फिरत असते. विवीध विषय, भाव-भावनांचा आविष्कार, सामाजिक आशय, सौंदर्यशास्त्र त्यांच्या चित्र शैली मधून साकारत कलात्मक आणि कल्पकतेचा आविष्कार रसिकांना अनुभवता येणार आहे. आयोजक वर्मा यांनी रसिकांनी या प्रदर्शनाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन केले आहे.

माहूर नगराध्यक्ष फिरोज दोसाणी, तहसिलदार डॉ. अभिजीत जगताप, गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार,नगरसेवक गोपू महामुने, सामाजिक कार्यकर्ते अनिल वाघमारे,म.रा.शि. प.ता.अ.शेषराव पाटील,शि. भा.ता.अ. अरविंद जाधव, म.रा. शि.प.जिल्हा सरचिटणीस जितेंद्र वर्मा, चित्रकार शरद तरडे पुणे, राम ओंकार दिल्ली, श्री आर्ट कला वर्गाचे संचालक सारंग नागठाणे,प्राचार्य प्रदीप नागतूरे पुसद, प्रा.गजानन बोबडे अकोला,प्रा. उदय भोईर संभाजीनगर,प्राचार्य एन.डी. अमरावती, डॉ.अरुण धकाते, पेंटर सुरेश आराध्ये, पेंटर जावेद, विजय सूर्यवंशी कळमनुरी यासह अनेक कलाप्रेमींनी चित्रकार रणजित वर्मा यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

## लोह्याच्या मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये जागतिक महिला दिन

**लोहा** -महिलांमध्ये गर्भशयाच्या मुखाच्या कॅन्सरचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी वेळीच वैद्यकीय लसीकरण आवश्यक आहे.जागतिक महिला दिनाच्या दिवशी मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये भाजपाच्या प्रदेश महिला आघाडीच्या उपाध्यक्षा व जलचळवळिच्या प्रणेत्या प्राणीताताई देवरे यांच्या हस्ते लसीकरण शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याचा



जास्तीत जास्त महिलांनी आयोग्याची तपासणी करून घ्यावी असे प्रणिताताई देवरे अहवान केले आहे. लोहा शहरातील डॉ मिलिंद धनसडे यांच्या मेडिकेअर हॉस्पिटलमध्ये स्त्री रोगतज्ज्ञ डॉ शमा कोरपेनवार -बुक्तरे याच्या पुढाकाराने जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर गर्भाशयाच्या मुखाचा कॅंसर लसीकरण शिबीर आयोजित करण्यात आले होते. भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा व जलचळवळीच्या प्रनेत्या प्राणिताताई देवरे चिखलीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. डॉ. धनसडे यांनी ग्रामीण भागातील अद्यावत उभी केलेली आरोग्यसेवा शेकडो रुग्ण व नातेवाईकांना दिलासा देणारी आहे.डॉ शमा यांनी लसीकरण शिबीर ठेवून महिलांना जनजागृती व त्याचे आरोग्य सदृढ राहावे यासाठी उपक्रम हाती घेतला आहे.

# पैनगंगा पुलावर संरक्षणात्मक काठ नसल्याने अपघाताचा धोका

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. ८ मार्च-**

तालुक्यातील किनवट येथील पैनगंगा नदीवरील पुलाच्या दोन्ही बाजूंना संरक्षणात्मक काठ किंवा लोखंडी रेलिंग नसल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. हा पूल परिसरातील नागरिक, शेतकरी, विद्यार्थी तसेच प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून दररोज मोठ्या प्रमाणावर ये-जा येथे होत असते. मात्र पुलाच्या कडेला कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.



विशेषतः रात्रीच्या वेळी तसेच पावसाळ्यात पुलावरून प्रवास करताना नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. दुचाकीस्वार आणि पादचारी यांना या परिस्थितीचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत असून, थोडीशी चूक झाली तरी मोठा अपघात घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

या संदर्भात स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा संबंधित प्रशासनाचे लक्ष वेधले असले तरी अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने दखल घेऊन पुलाच्या दोन्ही बाजूंना संरक्षणात्मक काठ किंवा लोखंडी रेलिंग उभारून नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

Shri Gyan Saraswati Educational & Welfare Society, Nanded
Swami Vivekananda Vidya Vihar, Barhali,
TQ. Mukhed Dist. Nanded
WANTED
For the academic year 2026-27 required following teachers category in our school.

| Sr. No. | Subject Name | Qualifaction | Vaccancies |
|---|---|---|---|
| 1. | Pre Primary | B.A. / B.SC. | 05 |
| 2. | English - 1st to 4th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 3. | Maths and Science - 1st to 4th | B.SC. / M.SC.D.ED / B.ED | 04 |
| 4. | English - 5th to 8th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 5. | Marathi 5th to 8th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 6. | Hindi - 5th to 8th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 7. | Maths - 5th to 8th | B.SC. / M.SC.D.ED / B.ED | 02 |
| 8. | Science - 5th to 8th | B.SC. / M.SC.D.ED / B.ED | 02 |
| 9. | Social Science - 6th to 10th | B.A. / M.A.D.ED. / B.ED | 02 |
| 10. | Physical education - 5th to 10th | B.P.ED. / M.P.ED. | 02 |

Interested Candidates should contact us on the number given below or send RESUME on the number given below.

- Experienced candidate will given preference.
- Better command in English language
- Monthly mindful salary.
- Demo class will conduct before appointment.
- Accomdation as per need.

CONTACT : 86985 15809 / 90963 10390

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** येथील आधार सामाजिक संस्था व राजश्री फाउंडेशनच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला यावेळी संस्थेचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते. आज सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून अगदी त्याच्याही पुढे जाऊन कार्य करत आहेत, या महिलांचे मनोबल वाढावे, त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने येथील आधार सामाजिक संस्था आणि राजश्री फाउंडेशनचे कार्यालय प्रकाश नगर याठिकाणी महिला बाल कल्याण विभागातील सेवानिवृत्त उप मुख्य कार्यकारी अधिकारी अड मल्लिकार्जुन करडखेलकर यांच्या शुभ हस्ते प्रा. अनिता गायकवाड, मुख्याध्यापक जयश्री ढवळे,डॉ. रुपाली येळीकर, पो. कॉ. अनिता सातपुते,रुकसाना मुल्ला, सौ. काळे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष धनंजय कांबळे, सचिव प्रा. रविंद्र सुरवसे, प्रा. कल्याण कांबळे, प्रा. शिवशरण हावळे, प्रा. संगमेश्र्वर पानगावे, प्रा. बालाजी माने, रेश्मा कांबळे, ज्योती सुरवसे, अतुल कांबळे आणि संस्थेचे प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरवसे, प्रास्ताविक बालाजी माने तर आभार संगीता कांबळे यांनी मानले.



## विविध वृत्त...

### प्रकल्प प्रदर्शनात जिजामाता विद्यालयाचे यश, जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक

**लातूर :** जिल्हास्तरीय अटल टिंकरिंग लॅब प्रकल्प प्रदर्शन २०२५-२६ मध्ये जिजामाता माध्यमिक विद्यालय, एम.आय.डी.सी., लातूर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरुड (जि. लातूर) यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रकल्प प्रदर्शनाचे दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यालयातील मयुरी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली इलेक्ट्रॉनिक प्रकल्प, शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली मेकॅनिकल प्रकल्प तसेच भाग्यशाली गुडे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल लिटरेसी प्रकल्प सादर करण्यात आले. प्रत्येक प्रकल्पासाठी दोन विद्यार्थ्यांचा सहभाग अशा एकूण आठ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

यामध्ये मेकॅनिकल विभागातील प्रकल्पाला जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. या प्रकल्पात मुंडे शुभम व सूर्यवंशी राधिका, शिंदे अधिष्ठा, अलोक वाघमोडे, वैष्णवी सोनवते, सूर्यवंशी राघव, वाघमारे श्रेया, चुनचुने शुभम या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शंकर पांचाळ, मयुरी काळे, भाग्यशाली गुडे व प्रा. सुधीर बाळापुरे यांचे संस्थेचे सचिव व शिक्षक आमदार विक्रम काळे, प्राचार्य अनिल बापू काळे तसेच प्राचार्या शुभांगीताई काळे, मुख्याध्यापक देविदास कोल्हे, प्रा. बाबासाहेब सोनवणे, राजकुमार शिंदे, गोकुळ मतकंटे, वैशाली वाघमारे व अर्जुन कांबळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. .

### डॉ. संतुजी रामजी लाड यांची जयंती उत्साहात साजरी

**लातूर :** सत्यशोधक समाजाचे अग्रदूत, महात्मा ज्योतिबा फुले यांचे सहकारी तथा शिष्य हिंदु खाटीक समाज भूषण डॉ संतुजी रामजी लाड यांची १८५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

लातूर शहराती गांधी मार्केट परिसरात डॉ. लाड यांचा पुतळा बसविण्यात येणार आहे. त्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणीच हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष एड. . व्यकटराव बेंद्रे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून खा. डॉ. शिवाजीराव काळगे उपस्थित होते. यावेळी नवनिर्वाचित महापौर जयश्रीताई भालचंद्र सोनकांबळे, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, गटनेते विजयकुमार साबदे, नगरसेविका सुजाता सौदागर, नगरसेवक अभिषेक पतंगे, बालाजी झिपरे, नगरसेवक गिरीश ब्याळे, नगरसेवक अँड. अतिश चिकटे, नगरसेवक उद्धव तेलंगे, नगरसेवक सचिन गायकवाड, नगरसेवक विनय जाकते, नगरसेविका जयश्री बाहेती, नगरसेविका करुणा शिंदे, सुनिल बसपुरे, शेख आ रफ, आसिफ बागवान, नगरसेविका सुरेखाताई ईगे, नगरसेवक गणेश गवारे, अँड रोहित सोमवंशी, तबरेज तांबोळी, नगरसेविका तबस्सुम शेख, नगरसेवक पवन सोलकर, नगरसेविका नसरीन शेख, इस्माईल शेख यांचा सत्कार डॉ. संतुजी लाड सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विश्वनाथ सौदागर, लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंह घोणे, एन. डी. सोनकांबळे यांची उपस्थिती होती तर डॉ. संतुजी लाड चॅरिटेबल ट्रस्टचे एड. प्रदिपसिंह गंगणे, एटीएम ग्रुप अध्यक्ष ताहेरभाई सौदागर, भारत धाकपाडे, एड. दत्तात्रय इंगळे, अजीज बागवान, महादेव फिसके, भारत थोरात, शिवाजी तपासे, भारत वंजारे, दीपक इंगळे, माजी मुख्याध्यापक राजाराम काथवटे, शिवशंकर फिस्के, विक्रम सौदागर, संजय कांबळे, अनिल कांबळे, ॲड. औदुंबर कांबळे, दीपक गंगणे आदींची उपस्थिती होती.

### व्हिडीएफ ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्समध्ये तांत्रिक महोत्सवाचे आयोजन

**लातूर :** विलासराव देशमुख फाऊंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स कॉलेज येथे मंगळवार दि. १० मार्च २०२६ रोजी राज्यस्तरीय तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांमधील तांत्रिक कौशल्यांना वाव देणे, नवकल्पनांना प्रोत्साहन देणे तसेच संशोधनाची दृष्टी विकसित करणे या उद्देशाने हा महोत्सव आयोजित करण्यात येत असल्याची माहिती कॉलेजच्या वतीने देण्यात आली. आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक ज्ञानावर न थांबता प्रत्यक्ष प्रयोग, प्रकल्प आणि संशोधनाकडे वळावे, या अभिनव संकल्पनेतून 'कल्पनेतून नवसर्जन' या संकल्पनेवर हा राज्यस्तरीय महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांना तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रत्यक्षात उतरवण्याची आणि व्यापक व्यासपीठावर मांडण्याची संधी मिळणार आहे. या महोत्सवामध्ये पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट प्रदर्शन आणि तांत्रिक प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचा समावेश असणार आहे. राज्यभरातील विविध पॉलिटेक्निकमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असून त्यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे आणि संशोधनपर कल्पनांचे सादरीकरण या निमित्ताने होणार आहे. शिक्षण क्षेत्रातील नामांकित तज्ज्ञ, उद्योजक तसेच शिक्षणतज्ज्ञ उपस्थित राहणार असून ते विद्यार्थ्यांना नवतंत्रज्ञान आणि करिअरच्या नव्या संधींबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

## रंगोत्सवात रंगली तरुणाई..!



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** लातूर शहर व परिसरात रविवारी रंगपंचमी उत्साहात साजरी करण्यात आली. अगदी सकाळपासून तरुणाई रंगोत्सवाच्या तयारीत असल्याचे पाहायला मिळत होते. शहराच्या प्रमुख रस्त्यावर सगळीकडे रंगाची उधळण करताना विविध वयोगटातील नागरिक दिसत होते. यामध्ये महिला आणि युवतींचा सहभागही उल्लेखनिय होता.

अनेक ठिकाणी होळीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशीच रंग खेळला जातो. मात्र, लातूर शहर आणि उदगीर वगळता अन्य तालुक्यात होळीनंतरच्या पाचव्या दिवशी म्हणजे रंगपंचमीच्या दिवशी हा उत्सव हर्षोल्हासात साजरा केला जातो. मागच्या काही वर्षात लातूर शहराचा विस्तार झपाट्याने वाढला आहे. त्यामुळे शहराच्या सर्वच भागात हा उत्सव मौज - मस्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शहरात ठिकठिकाणी डीजेच्या तालावर तरुणाई थिरकताना दिसत होती. लोकप्रिय गीतांच्या धुनीवर रंगाची उधळण केली जात होती. रंगपंचमी म्हटले की, रंग - भांग ओघाने आलेच. शहराच्या ठराविक भागात या दिवशी नागरिकांना थंडाईच्या माध्यमातून ही भांग उपलब्ध करून दिली जाते. काही ठिकाणी तर मित्रमंडळींना बोलावून आग्रहाने या थंडाईचा आस्वाद घेण्यास भाग पाडले जाते. यामध्ये शहरातील सेंट्रल हनुमान परिसर अग्रेसर असतो. या परिसरात रंगाची उधळण करणाऱ्यांना हे पेय उपलब्ध करून दिले जाते. त्याचा मोठ्या संख्येने आस्वादही घेतला जातो.

शहराच्या सुभाष चौक, खडक हनुमान, पटेल चौकसह गावभागात ठिकठिकाणी संगीताच्या तालावर रंगाची उधळण मुक्तकंठाने केली जात असल्याचे पाहायला मिळाले. बच्चेकंपनी तर भल्या सकाळपासूनच हातात पिचकाऱ्या घेऊन एकमेकांवर रंग उडवताना दिसत होते. ही मंडळी केवळ आपल्या सवंगड्यांच्या अंगावरच रंग उडवत नव्हती तर रस्त्याने जाणाऱ्या - येणाऱ्यांची अंगावर रंग उडवून आनंद व्यक्त करत होती. लहानमुले आनंदाने रंग खेळत असल्याचे पाहून अंगावर रंग का टाकला ? अशी विचारणाही कोणी करतांना दिसत नव्हते. दरवर्षी रंगपंचमीच्या दिवशी इतर लोकप्रिय गीताबरोबरच शोले चित्रपटातील ' होली के दिन दिल खिल जाते हैं , रंगो में रंग मिल जाते हैं ' हे गीतही ऐकायला मिळत होते. पन्नास वर्षे उलटून गेली तरीही या गीताची भारतीय प्रेक्षकांवरची जादू तसूभरही कमी झालेली नसल्याचे या निमित्ताने अनुभवायला मिळाले.

रंगपंचमीच्या दिवशी शहरातील हनुमान चौक, ट्युशन एरिया, पाच नंबर चौक, नवा रेणापूर नाका, संविधान चौक, राजीव गांधी चौक तसेच इतर महत्त्वाच्या चौक व गर्दीच्या ठिकाणी विशेष नाकाबंदी व कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या ठिकाणी पोलिसांकडून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवले जात असल्याचे पाहायला मिळाले.

महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दामिनी पथकाकडून विशेष गस्त वाढविण्यात आली होती. काही युवकांकडून उत्साहाच्या भरात रॅश ड्रायव्हिंग, मोटारसायकलवर दोनपेक्षा अधिक जण बसून धोकादायक पद्धतीने वाहन चालविणे, स्टंटबाजी करणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणे असे प्रकार घडण्याची शक्यता वर्तवली जात होती. ती प्रत्यक्षात उतरली. वाहनांवर दोहांपेक्षा जास्त जण बसून अतिशय धोकादायकपणे वाहने चालवतानाही काही मंडळी आढळून आली. पोलीस प्रशासनाने नुकतेच फटाके सायलेन्सर धारक वाहनांवर कारवाई केली होती. तरीही रंगपंचमीदिवशी रिंग रोड परिसरात फटाके सायलेन्सरच्या गाड्या फिरताना आढळून आल्या. उत्साहाच्या भारत अनेकांकडून वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन केल्याचेही पाहावयास मिळाले. एकंदर उत्साही वातावरणात रंगपंचमी, रंगोत्सव साजरा करण्यात आला.

## शिवसेना लातूर शाखेच्या वतीने शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** प्रतिवर्षाप्रमाणे तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करताना शिवसेनेच्या लातूर शाखेच्या वतीने येथील शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट देण्यात आले.

याप्रसंगी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे लातूर शहर प्रमुख दिनेश बोरा, शहर संघटक संदीपमामा जाधव, चंद्रकांत शिंदे, श्रीनिवास लांडगे, दत्ता भोसले, आकाश चामले , शंकर कलवले यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली राज्यात शिवसेनेची कारकीर्द दिवसेंदिवस बहरत आहे. सामान्यांना न्याय देण्यासोबतच तरुण पिढीला ऐतिहासिक वारशांची संपूर्ण माहिती मिळावी, त्यांच्या ज्ञानात कमालीची भर पडावी याकरिता दरवर्षी लातूर शहरातील शिवछत्रपती ग्रंथालयास ऐतिहासिक ग्रंथ भेट देण्यात येतात. या ग्रंथाचा उपयोग स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह इतिहास अभ्यासकांना होताना दिसतो. शिव जयंतीच्या निमित्ताने अनावश्यक आणि अवास्तव खर्चाला फाटा देऊन छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील मौलिक ग्रंथ भेट देण्यात आले. या ऐतिहासिक ग्रंथांचा आपल्याला अतिशय उपयोग होत असल्याच्या प्रतिक्रिया यावेळी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.



## एआय अँड डिजिटल स्किल्स फॉर करिअर ग्रोथ विषयावर एक दिवसीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर येथे.४ मार्च २०२६ रोजी फ्युचर-रेडी स्टुडंट्स: एआय अँड डिजिटल स्किल्स फॉर करिअर ग्रोथ या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित केली. या कार्यशाळेत बीसीए, बीबीए, बी.कॉम, एमबीए, एम.कॉम आणि एमसीए या शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल कौशल्यांचे आधुनिक करिअरमध्ये असलेले महत्त्व समजावून सांगणे हा होता.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ग्रोथ स्टोरी कंपनीचे संस्थापक श्री. गौरव बाहेती आणि सौ. जान्हवी बाहेती होत्या. आपल्या भाषणात श्री. बाहेती यांनी स्पष्ट केले की तंत्रज्ञान माणसांची जागा घेणार नाही, परंतु जे लोक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करतील तेच भविष्यात आघाडीवर राहतील. त्यांनी विद्यार्थ्यांना डिजिटल कौशल्ये आत्मसात करण्याचे आणि नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एम सी ए विभाग प्रमुख डॉ. एस. व्ही. स्वामी यांनी भूषविले. तसेच प्रा.श्री. एन. व्ही. पाटील हेही व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्रा. एस. एन. चेरकर यांनी केले, तर अतिथी परिचय सहाय्यक प्रा. धनश्री शर्मा यांनी करून दिला. आभार प्रदर्शन सहाय्यक प्रा. एस. एन. पाटील यांनी केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी ठरला. विद्यार्थ्यांना भविष्यातील करिअर संधींसाठी एआय आणि डिजिटल कौशल्यांनी सज्ज होण्याची प्रेरणा मिळाली.

## ग्रंथालय संघाचे वार्षिक सभासद नोंदणी अभियान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाची सन २०२६ या वर्षासाठीची सभासद नोंदणी दि ७ मार्च रोजी पासून सुरु झाली आहे. लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक शासनमान्य ग्रंथलयांनी 'आपापल्या तालुक्यातील तालुका प्रतिनिधीकडे दि. २५ मार्च २०२६ पर्यंत संस्था व व्यक्ती सभासद नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उदगीर येथे सुर्यकांत शिरसे, राम मोतीपवळे, जळकोट-यशवंत कुलकर्णी, अशोक कारभारी, शिरुर अनंतपाळ-काशिनाथ बोडके, देवणी अनिल पाटील, निलंगा गुप्तलिंग स्वामी, औसा प्रभाकर कापसे, लातूर- राम मेकले, हुतात्मा स्मारक, लातूर, चाकूर- हावगीराव बेरकीळे, तुकाराम सुगावकर, अहमदपूर-अशोक खोडवे, नंदकुमार घोगरे, रेणापूर- सिध्देश्र्वर उकिरडे या तालुका प्रतिनिधींकडे आपली सभासद नोंदणी करावी,असे आवाहन जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## सिध्देश्वर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** स्त्री म्हणजे शक्ती, स्त्री म्हणजे प्रेरणा, स्त्री म्हणजे जीवनाची सुंदर कहाणी. स्त्री ही केवळ आई, बहीण, पत्नी किंवा मुलगी नसून ती समाजाची शक्ती आहे तिच्या कष्टांमुळे आणि समर्पणामुळे कुटुंब समाज भाणि देश प्रगती करतो असे जागतिक महिला दिनानिमित्त सिध्देश्वर कोलेज ऑफ फार्मसीच्य फार्मसीच्या प्राचार्या डॉ. शामलिला बावगे (जेवळे) मॅडम यांनी सांगितले.



दिं.८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयात डॉ. शामलिला बावगे मॅडम आणि प्रमुख पाहुणे अश्विनी मॅडम, क्राती सुर्यवंशी मॅडम, यांच्या हस्ते वृक्षारोपण करून हा दीन साजरा करण्यात आला. वक्ष लावा,वक्ष जगवा. झाडे आपल्याला प्राणवायू देतात, पर्यावरण स्वच्छ ठेवतात. आजचे वृक्षारोपण, उद्या चे जीवन आहे असे सुंदर मार्गदर्शन अश्विनी मॅडम नी केले. या प्रसंगी प्रा.आकाश पाटील, प्रा.भुईभार ऊषा, प्रा.शेळके सुप्रिया, प्रा. शिवणगे सागर ग्रंथपाल अलका कोरे सर्व विद्याथ्यर्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## पोलिसांकडून मोटारसायकल चोरी करून स्क्रॅप करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ०८ मार्च :** लातूर शहरातील गर्दीच्या ठिकाणांहून मोटारसायकली चोरी करून त्या स्क्रॅपमध्ये रूपांतरित करणाऱ्या टोळीचा गांधी चौक पोलिसांनी पर्दाफाश केला असून या प्रकरणी चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत चोरी केलेल्या मोटारसायकलींचे सुटे भाग तसेच एक मोटारसायकल असा एकूण सुमारे १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ७ गुन्ह्यांचा उलगडा करण्यात पोलिसांना यश आले आहे.

पोलीस ठाणे गांधी चौक हद्दीत मागील काही दिवसांत गुळ मार्केट, भाजी मार्केट तसेच बसस्थानक परिसरातील वर्दळीच्या ठिकाणांहून मोटारसायकल चोरीच्या घटना घडल्या होत्या. या प्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात विविध गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर गुन्ह्यांचा तपास सुरू असताना पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांनी पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेला सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून व गोपनीय बातमीदारांच्या माध्यमातून आरोपींचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार विशेष पथके तयार करून तपासाची दिशा निश्चित करण्यात आली.

तपासादरम्यान पथकाने दि. ०६ मार्च २०२६ रोजी सापळा रचून आरोपी रफिक रहीमसाब शेख (वय ५१ वर्षे, रा. नायगाव उमरगा ता. चाकूर जि. लातूर, सध्या राहणार एकमिनार मस्जिदजवळ, आजमनगर लातूर) यास मोटारसायकल चोरी करताना रंगेहात पकडले. त्याच्या ताब्यातून हिरो होंडा कंपनीची ऊश्रऊश्रींश (एमएच-२४ एडी-४२२६) अंदाजे किंमत २५ हजार रुपये ही मोटारसायकल जप्त करण्यात आली. आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने गांधी चौक पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या अनेक मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. तसेच चोरी केलेल्या मोटारसायकली आपल्या साथीदारांकडे देऊन त्या स्क्रॅपमध्ये रूपांतरित करून सुटे भाग विक्रीस काढत असल्याची माहिती समोर आली.



त्यानुसार पोलिसांनी आरोपीचे साथीदार नजीर शमीम शेख,तालीफ महमद शेख, युसुफ इस्माईल शेख यांना अटक केली. आरोपींकडून चोरी केलेल्या मोटारसायकली स्क्रॅप करून वेगवेगळे केलेले सहा मोटारसायकलींचे सुटे भाग जप्त करण्यात आले. या कारवाईत पोलिसांनी एक मोटारसायकल व सहा मोटारसायकलींचे स्क्रॅप केलेले सुटे भाग असा एकूण १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून गांधी चौक पोलीस ठाण्यातील मोटारसायकल चोरीचे एकूण ७ गुन्हे उघडकीस आले आहेत. या प्रकरणी पुढील तपास गांधी चौक पोलीस करीत आहेत.

सदर कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे व साहेबराव नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांच्या नेतृत्वाखालील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनि गणेश चित्ते, एएसआय राजेंद्र टेकाळे, पोलीस अंमलदार राम गवारे, प्रकाश भोसले, रविसन जाधव, संतोष गिरी, सचिन चंद्रपाटले, शिवा भाडुळे, गोविंद सरवदे, अनिल कज्जेवाड, राहुल दराडे, दीपक थोटे तसेच चालक गोविंद बेंबडे यांनी केली आहे.